अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९२ । शनिवार २५ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



'सहजयोग' भाग ३७

## भोळेपणा

जे लोक स्वतःला फार मोठे शास्त्रज्ञ, शिकलेले, सुशिक्षित आणखीन आचार्य वगैरे समजतात, त्यांच्यामध्ये सहजयोग घुसत नाही. असे मी पुष्कळ विद्वान पाहिले आणि एक साधारण मनुष्य ज्याला धड कपडा नाही, खायला नाही अशा माणसामध्ये सहजयोग सहजच घुसतो. शिक्षणाने परमेश्वर जाणता येत नाही. असे म्हटल्याबरोबर सगळे शिक्षणाचे अधिकारी मला मारायला उठतील. शिक्षणाने संसारातील सर्व लौकिक गोष्टी जाणता येतील. पण परमेश्वराच्या कार्याला जाणण्यासाठी दुसरे मार्ग पाहिजेत. दूसरे गुण पाहिजेत. पैकी मुख्य गुण म्हणजे भोळेपणा. ज्याला इंग्लिश भाषेमध्ये इनोसन्स म्हणतात. लहान मुलांमध्ये असतो बघा भोळेपणा. काही काही मोठी माणसेपण फार भोळी असतात हो! ठगविली जातात ती. अशा लोकांना लोक त्रासही जास्त देतात. छळतातही फार ! म्हणूनच सगळ्या संत लोकांना फार छळलंय या जगाने आणि आज ही छळताहेत. याचेच रडू येते कधी, कधी. आपण जी मंडळी पार झालात ती सुद्धा संत मंडळी आहात. संतच नव्हे तर देवता स्वरूप आहात. आज देवतांच्या ठिकाणी तुम्ही आलात.देव जागवले गेलेत आपल्यामध्ये. हे देवपण आलेले आहे आपल्यामध्ये. तुम्हाला बालेकिल्ला दिलेला आहे जो तुमच्याच आतमध्ये आहे. तो म्हणजे निर्विचार स्थिती. थॉटलेस अवेअरनेस. तुम्ही जर त्या किल्ल्यात बसलात तर कोणाची हिम्मत नाही तिथे पाय ठेवायची! हे लक्षात ठेवा. मुंबई, २२ जानेवारी १९७५

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्वाचे..

### सरकारी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे!

मुंबई : सुधारीत निवृत्ती वेतन योजनेसह १८ मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप अखेर मागे घेण्यात आला. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या आश्वासनांचे इतिवृत्त मिळाल्यानंतर संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संपामध्ये शासकीय, निमशासकीय तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. सलग चार दिवस सुरू असलेल्या संपामुळे राज्यातील महसूल विभागाच्या कार्यालयावर सर्वाधिक परिणाम झाला. यामुळे मुद्रांक नोंदणीसह जमीन तसेच घर खरेदी व्यवहारांवर परिणाम झाला. त्याचप्रमाणे विवाह नोंदणीचेही काम ठप्प झाले होते. अखेर चौथ्या दिवशी या संपावर तोडगा काढण्यात राज्य सरकारला यश आले.

# समतेच्या नावाखाली सहकारात घोटाळ्यांचा 'आदर्श'

## एकमेकांच्या प्रेरणेने सामान्यांच्या ठेवीवर लुटीचा 'नागोबा'

### सहकारी पतसंस्थांच्या विश्वासार्हतेवर संकट!

करण नवले । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील १५ हजार सहकारी पतसंस्था आणि मल्टीस्टेट सोसायट्यांच्या विश्वासाला तडे देणाऱ्या घटना एकाम ागून एक समोर येत आहेत. नुकताच पतसंस्था फेडरेशनचे राज्य अध्यक्ष काका कोयटे यांनी दिलेला राजीनामा आणि 'समता'मधील खरात प्रकरणाने सहकार क्षेत्रातील काही चुकीचा प्रकारांवर प्रकाशझोत टाकला. सामान्य ठेवीदारांनी आता सतर्क होण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्र ही सहकाराची पंढरी मानली जाते. राज्यात १५ हजारांहून अधिक सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत. ग्रामीण आणि निमशहरी अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून या संस्थांकडे पाहिले जाते. मात्र, गेल्या पाच वर्षांत 'बीएचआर', 'ज्ञानराधा', 'भगवानबाबा' आणि आता 'समता' सारख्या संस्थांच्या माध्यमातून जे काही समोर आले, ते पाहता हा कणा आता भ्रष्टाचार आणि बेनामी व्यवहारांच्या ओझ्याखाली दबला गेला आहे की काय?, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

राज्यातील मोठ्या पतसंस्थांच्या घोटाळ्यांची मालिका पाहिली तर एक ठराविक पॅटर्न (कार्यपद्धती) लक्षात येतो. गेल्या ५ वर्षांत सहकार विभागाने रेकॉर्डवर घेतलेल्या गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार, सुमारे १० ते १५ हजार कोटींहून अधिक रुपयांचे अपहार विविध पतसंस्थांमध्ये झाले आहेत.

ज्ञानराधा पतसंस्थेसारख्या प्रकरणांमध्ये कमी किम तीच्या मालमत्ता अधिक किमतीच्या दाखवून कागदोपत्री पैशाचा फुगवटा केला जातो, हे दिसून आले. ही एक प्रकारची 'पॉन्झी स्कीम' ठरते. दोन तीन हजार कोटींची मालमत्ता तीदेखील ठेवीदारांच्या पैशातून उभी केलेली बँकांना तीस हजार कोटी रुपयांची दाखवून स्वतःचे नवे



विश्व निर्माण करण्याचा प्रयत्न ज्ञानराधाच्या माध्यमातून संचालकांनी केला. ठेवीदार मात्र आपले पैसे मिळतील या भाबड्या भावनेने न्यायालयात हेलपाटे मारत आहेत. बीएचआरच्या ठेवीदारांचेही काही वेगळे झाले नाही. आम्ही लाखो रुपयांचे प्लॉट द्यायला तयार आहोत, असे भासवून संचालक कमी किमतीच्या मालमत्ता म हागड्या असल्याचे सांगून ठेवीदारांच्या गळ्यात मारत आहेत.

'समता' पतसंस्थेत भोंदू बाबा कॅप्टन अशोक खरात याच्या अनेकांच्या नावावर **(पान ४ वर)**

### ठेवीदारांनो, भविष्यातील घोटाळ्यांपासून कसे वाचायचे?

■ भविष्यात आपले पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी ठेवीदारांनी व्याजाच्या आमिषाला बळी पडू नये. राष्ट्रीयकृत बँकांपेक्षा ४-५ टक्के जास्त व्याज देण्याचे आमिष दाखवणारी संस्था संशयास्पद असू शकते. संस्था जर १०-१२ टक्के व्याज ठेवींवर देत असेल, तर ती संस्था कर्ज कोणत्या दराने देत असेल? आणि एवढा परतावा देणारा व्यवसाय कोणता? याचा विचार करा.

■ 'मल्टिस्टेट'च्या नावाखालील फसवणूक ओळखा. 'मल्टिस्टेट' म्हणजे ती संस्था खूप मोठी आहे असे नाही. केवळ दोन राज्यांत कार्यक्षेत्र असले की मल्टिस्टेटचा दर्जा मिळतो. अशा संस्थांवर राज्य सहकार विभागाचे पूर्ण नियंत्रण नसते, ज्याचा फायदा संचालक घेतात. त्यांच्या ऑडिट रिपोर्टची मागणी करा.

■ कुठल्याही संस्थेत ठेवी ठेवण्यापूर्वी एनपीए किती आहे? याची चौकशी करा. संस्थेचे थकलेले कर्ज (एनपीए) १० टक्क्यांहून अधिक असेल, तर ती संस्था धोक्याच्या पातळीवर आहे. वार्षिक अहवालात ही माहिती दिलेली असते, ती वाचण्याची सवय लावा.

■ सर्वात महत्त्वाचं म्हणजे, संचालकांचा पार्श्वभूमी तपासा. संस्थेचे संचालक जर राजकारणी असतील किंवा त्यांचे इतर विलासी व्यवसाय (उदा. रिअल इस्टेट, चित्रपट, शेअर बाजार, विमान व्यवहार) असतील, तर सावध व्हा. सामान्यतः अशा व्यवहारांसाठी पतसंस्थेतील ठेवींचा गैरवापर केला जातो.

■ ऑडिट रिपोर्ट आणि वर्गवारीत संस्थेला ऑडिटमध्ये 'अ' (ए) वर्ग आहे की नाही, हे तपासा. 'ब' किंवा 'क' वर्ग असलेल्या संस्थांम ध्ये मोठ्या ठेवी ठेवणे धोक्याचे ठरू शकते.

■ कर्जदारांनीही केवळ कर्ज मिळते म्हणून कागदपत्रांवर कुठेही सह्या करू नये. अनेकदा कर्जदाराच्या नावावर जास्तीचे कर्ज दाखवून ती रक्कम संचालक स्वतःकडे वळवतात. आपल्या कर्जाचे नियमित स्टेटमेंट घेत राहा.

# जामखेडमध्ये नर्सची आत्महत्या!

### घातपाताच्या संशयाने खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड शहरातील बस स्थानक परिसरात असलेल्या एका खाजगी हॉस्पिटल हॉस्पिटलच्या बाथरूम मध्ये एका नर्सचा मृतदेह आढळून आला. बराच वेळ गेल्यानंतर परिसरातील कर्मचाऱ्यांनी हॉस्पिटलच्या बाथरूमच दरवाजा तोडून नर्स चा मृतदेह बाहेर काढला.



शबनम दस्तगीर सय्यद (वय २९) असे या नर्सचे नाव आहे. तिने आत्महत्या केली की हा घातपाताचा प्रकार असावा असा संशय नागरिकांच्या चर्चेतून व्यक्त होत आहे. मात्र बाथरुममध्ये इंजेक्शनची सुई सापडली आहे. स्वतःच इंजेक्शन लाऊन आत्महत्या केली का इतर कोणते कारण आहे हे अद्याप समजू शकलेले नाही. या प्रकाराने जामखेड शहरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, मयतचे वडील दस्तगीर सय्यद (वय ५५, रा. पोकळे वस्ती, जामखेड) यांनी दिलेल्या खबरीवरून, त्यांची मुलगी शबनम दस्तगीर सय्यद ही जामखेड शहरातील बस स्थानक परिसरातील एका खाजगी हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणून काम करीत होती. गुरुवारी (दि. २३) सकाळी १० वाजता ती नेहमीप्रमाणे कामावर गेली होती. सकाळी साडेदहा वाजता ती हॉस्पीटलमधील बाथरूममध्ये गेली, मात्र बराच वेळ ती बाहेर आली नाही. त्यामुळे हॉस्पिटल मधिल कर्मचाऱ्यांनी दरवाजा तोडून पाहिले असता, ती बेशुद्धावस्थेत बाथरूम मध्ये आढळून आली. डॉक्टरांनी पाहीले असता ती मृत झाल्याचे दिसून आले. नंतर तिला जामखेड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुपारी २.३० वाजता डॉक्टरांनी शबनम हिचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. याप्रकरणी जामखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. नर्स शबनम दस्तगीर ही विवाहित असून, तिला पाच व सहा वर्षांची दोन मुले आहेत. घटस्फोट झाल्याने गेल्या काही वर्षांपासून ती माहेरी वडिलांकडे जामखेड येथे राहत होती. जामखेड शहरातील एका हॉस्पिटलमध्ये नर्स म्हणू कार्यरत होती. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. तिने आत्महत्या केली की तिचा घातपात झाला याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात आहे. पुढील तपास जामखेड पोलिस करत आहेत.

> ■ **मयताच्या हातावर इंजेक्शनची टोचलेली सुईची खुन दिसुन आली आहे. नेमके शरीरात कोणते औषध घेऊन आत्महत्या केली आहे का? यासाठी डॉक्टरांनी मयताचा व्हीसेरा कढुन ठेवला आहे. पोलीस हा व्हीसेरा तपासणीसाठी नाशिक येथे पाठवणार आहेत. त्यानंतरच आत्महत्याचे खरे कारण समजु शकणार आहे.**
> **- डॉ. कुंडलिक अवसरे, वैद्यकीय अधिकारी**

# पोलीस ठाण्यात गोंधळ घातल्याप्रप्रकरणी बी. जे. देशमुखांवर दुसरा गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अकोले :** एका गुन्ह्याच्या तपासासाठी बोलावले असता पोलीस ठाण्यात जमाव जमवून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी कोतूळ येथील बाळासाहेब जयराम देशमुख ऊर्फ बी. जे. देशमुख यांच्यासह २० ते २५ जणांवर अकोले पोलीस ठाण्यात दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

> ■ **आम्ही कोणत्याही राजकीय दबावाखाली काम करत नाही. कायदेशीर तपासाला सहकार्य करण्याऐवजी गोंधळ घातल्यामुळे ही कारवाई केली आहे. तपासात सहकार्य न लाभल्यास पुढील अटकेची प्रक्रिया सुरू केली जाईल.**
> **- अकोले पोलीस**

बी. जे. देशमुख आणि त्यांचा मुलगा शुभम देशमुख यांच्यावर सप्टेंबर २०२३ मध्ये ग्रामसभेत गोंधळ घातल्याप्रकरणी उपसरपंचांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याच्या तपासासाठी हवालदार अनिल जाधव यांनी देशमुखांना वारंवार नोटिसा बजावल्या होत्या, मात्र त्यांनी त्या स्वीकारल्या नाहीत. अखेर व्हॉट्सॲपवरून नोटीस पाठवून त्यांना २० एप्रिल २०२६ रोजी हजर राहण्यास सांगण्यात आले होते. ठरलेल्या वेळी बी. जे. देशमुख हे एकटे न येता २५ ते ३० समर्थकांसह पोलीस ठाण्यात आले. यावेळी त्यांनी मोठ्या प्रमाणावर आरडाओरडा करून गोंधळ घातल्याने पोलीस ठाण्याचे कामकाज ठप्प झाले. बाहेरगावच्या महिला फिर्यादींना तक्रार न देताच परत जावे लागले. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे आणि सरकारी कामात अडथळा आणल्यामुळे पोलिसांनी बीएनएस कलम २२१ व मुंबई पोलीस अधिनियमानुसार हा गुन्हा दाखल केला आहे.

# 'आप'ला भगवे खिंडार

## दोन-तृतीयांश खासदारांसह राघव चड्ढा भाजपमध्ये!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशाच्या राजकारणात आणि विशेषतः दिल्लीत एक मोठा राजकीय भूकंप झाला आहे. आम आदमी पक्षाचे चाणक्य मानले जाणारे राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी पक्षाला रामराम ठोकत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे, चड्ढा यांनी एकट्याने नव्हे, तर पक्षाच्या १० पैकी ७ खासदारांच्या समर्थनासह भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतल्याने 'आप'चे अस्तित्व संकटात आले आहे.

राघव चड्ढा यांच्यासोबत संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांसारख्या दिग्गज खासदारांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप प्रवेशाची अधिकृत घोषणा केली. चड्ढा यांनी दावा केला की, राज्यसभेतील 'आप'च्या दोन-तृतीयांश सदस्यांनी भारतीय राज्यघटनेतील तरतुदींनुसार भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. या गटामध्ये हरभजन सिंग, स्वाती मालीवाल, विक्रमजीत साहनी आणि राजेंद्र गुप्ता यांसारख्या मोठ्या नावांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. यामुळे पक्षांतरबंदी कायद्याची टांगती तलवारही त्यांच्यावर राहणार नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना चड्ढा म्हणाले की, देशाच्या विकासासाठी मजबूत नेतृत्वाची गरज आहे आणि म्हणूनच मी हा निर्णय घेतला. या घडामोडीमुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला असून, आगामी निवडणुकांपूर्वीच दिल्लीतील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत.

### 'चुकीच्या पक्षातला योग्य माणूस'

**राघव चड्ढा यांनी पक्ष सोडताना 'आप'वर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. मी आयुष्याची १५ वर्षे या पक्षाला दिली, रक्ताचे पाणी केले. पण आज हा पक्ष आपल्या मूळ तत्त्वांपासून आणि नैतिकतेपासून पूर्णपणे भरकटला आहे. पक्षात लोकशाही उरली नसून आपले विचार मांडण्याची संधी दिली जात नाही. पक्ष आता देशहितासाठी नव्हे, तर काही मोजक्या व्यक्तींच्या फायद्यासाठी काम करत आहे. मी चुकीच्या पक्षातला योग्य माणूस आहे, असे म्हणत त्यांनी आपली अनेक वर्षांपासून पक्षात घुसमट होत असल्याचे खा. राघव चड्ढा यांनी स्पष्ट केले.**





# 'बाळूमामाचा अवतार' मनोहर भोसले अटकेत!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोलापूर :** स्वतःलाबाळू मामाचा अवतार सांगणाऱ्या मनोहर मामा भोसलेला आज सोलापूर ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतलंय. आर्थिक फसवणूक आणि भोंदुगिरीच्या प्रकरणात कुर्डुवाडीपोलिसांनी मनोहर भोसले याला अटक केली आहे. या आधी मनोहर मामा भोसले विरोधात ४ गुन्हे दाखल आहेत. करमाळा आणि सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात महिलांवर अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर भोंदूगिरी आणि आर्थिक फसवणूक प्रकरणात बाराम तीपोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच दौंडपोलिसांत आर्थिक फसवणूक प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आज कुर्डुवाडीपोलिस स्थानकात आर्थिक **(पान ४ वर)**

# रिक्षा, टॅक्सीचालकांसाठी मराठी सक्तीची!

## महाराष्ट्र दिनापासून अंमलबजावणी : रिक्षा, टॅक्सी चालकांचा संपाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यात ऑटो आणि रिक्षा चालकांना मराठी सक्तीचा नियम करण्यात येणार आहे. येत्या महाराष्ट्र दिनापासून (१ मे) या नियमाची अंमलबजावणी केली जाणार आहे. तर दुसरीकडे येत्या ४ मे रोजीपासून आम्ही या निर्णयाविरोधात संपावर जाऊ, अशी भूमिका सर्वच ऑटो, टॅक्सी चालकांनी घेतली आहे.

विशेष म्हणजे एकनाथ शिंदे यांच्याच शिवसेनेतील काही एका नेत्याने या निर्णयाला विरोध केला आहे. त्यामुळे सरकार या नियमावर पुनर्विचार करणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. असे असतानाच आता मराठी सक्तीच्या निर्णयाबाबत सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. राज्य परिवहन आयुक्तांनी याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाला पाठवला आहे. त्यामुळे आता मराठी सक्तीच्या निर्णयाची अंमलबजावणी होणारच, असा अर्थ त्यातून काढला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकले आहे. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ४, ७८ आणि ८५ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, त्याअंतर्गत वाहनचालकांसाठी मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान ('वर्किंग नॉलेज') अनिवार्य करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. राज्याच्या परिवहन आयुक्तांनी यासंदर्भातील प्रस्ताव गृह विभागाकडे सादर केला आहे. त्यानुसार मसुदा अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रस्तावित बदलांनुसार, सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याची परवानगी देताना अर्जदाराच्या चारित्र्य व पार्श्वभूमीबरोबरच मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान तपासण्याचा अधिकार परवाना प्राधिकरणाला देण्यात येणार आहे. नवीन तरतुदीनुसार, सार्वजनिक सेवा वाहन चालविण्याची परवानगी देताना मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान तपासले जाणार आहे. मीटर असलेल्या मोटार कॅब वाहनांसाठी परवान्यांच्या अतिरिक्त अटींमध्ये मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात येणार आहे. विशेषतः ऑटो रिक्षा व टॅक्सी (मोटार कॅब) चालकांच्या परवाना नूतनीकरणाच्या वेळी म राठीचे ज्ञान दाखवणे बंधनकारक असेल.

यामुळे राज्यातील रिक्षा व टॅक्सी चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधणे अधिक सुलभ होणार आहे.

### हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरू

**या मसुदा नियमांवर नागरिक, संघटना तसेच संबंधित घटकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचनांचा शासनाकडून विचार करण्यात येणार आहे. सुसंवादातून सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न सरकारचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत स्थानिक भाषेला प्राधान्य मिळणार असून, प्रवाशांना अधिक सुलभ व स्नेही सेवा मिळेल.**

**- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक**



# गुरूमाता गं.भा.सरुबाई पेसोडे यांच्या चौदाव्यानिमित्त देवगडला गंगापूजन सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** तालुक्यातील श्री गुरूदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड संस्थान येथे आज शनिवार दि.२५ एप्रिल रोजी राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या म ातोश्री वै. गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील यांच्या १४ व्या विधीच्या निमित्ताने गंगापूजन सोहळयासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

श्री गुरुदेव दत्त पिठ श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या मातोश्री वै. गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील यांच्या चौदाव्या विधी निमित्ताने उदकशांती व गंगापूजन सोहळा उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या नेतृ त्वाखाली राज्यभरातील संत महंतांच्या उपस्थितीत होणार आहे. यानिमित्ताने सकाळी ९ ते ११ यावेळेत सावखेडा येथील गिरी आश्रमाचे महंत स्वामी कैलासगिरी महाराज यांचे हरि किर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुमाता सरू आईंच्या चौदाव्या विधी गंगापूजन व उदक शांती कार्यक्रम ात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने संत मंडळी व भाविक येणार असल्याने त्यादृष्टीने उत्कृष्ट नियोजन देवगड संस्थान व श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले. चौदाव्या निमित्त होणाऱ्या गंगापूजन व किर्तन सोहळ्याला भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन देवगड संस्थानच्या भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# 'झाडू'न पडझड

भारतीय राजकारणात 'धक्कातंत्र' आता नवीन राहिलेले नाही, पण आम आदमी पार्टीच्या (आप) १० पैकी ७ खासदारांनी थेट भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणे, हा केवळ राजकीय भूकंप नसून एका विचारधारेचा झालेला नैतिक पराभव आहे. राघव चड्ढा यांच्यासारख्या तरुण आणि आक्रमक चेहऱ्यासह स्वाती मालीवाल, हरभजन सिंग आणि संदीप पाठक यांनी भाजपची वाट धरणे, हे 'ऑपरेशन लोटस'च्या यशापेक्षा 'आप'च्या अंतर्गत विसंवादाचे आणि विचलनाचे मोठे लक्षण आहे. ज्या पक्षाने 'भ्रष्टाचारमुक्ती' आणि 'पर्यायी राजकारण' ही बिरुदावली मिरवत सत्ता स्थापन केली, त्याच पक्षाचे शिलेदार आज त्याच 'भ्रष्ट' ठरवलेल्या व्यवस्थेचा भाग बनत आहेत, ही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे.

आम आदमी पार्टीची स्थापना ही अण्णा हजारेंच्या आंदोलनातून झाली होती. प्रस्थापित राजकारण्यांना शिव्या घालत, ''आम्ही राजकारण बदलण्यासाठी आलो आहोत,'' असे ठणकावून सांगणाऱ्या अरविंद केजरीवाल यांच्यासाठी हा सर्वात मोठा धक्का आहे. खासदार फुटणे ही गोष्ट नवीन नाही, पण ज्या पक्षाची ओळख 'अभ्यासू आणि सुशिक्षित' लोकांचा संच अशी होती, तिथले ७० टक्के खासदार फुटतात, तेव्हा पक्षश्रेष्ठींच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते.

राघव चड्ढा यांना राज्यसभेच्या उपनेतेपदावरून हटवणे, हे या बंडाचे तात्कालिक कारण असू शकते; परंतु मूळ कारण हे सत्तेचे समीकरण आणि तपास यंत्रणांचा धाक असल्याचे संजय सिंह यांच्या आरोपांवरून स्पष्ट होते. राजकारणात 'विकास साधण्यासाठी सत्तेसोबत जाणे' हा तर्क आता गुळगुळीत झाला आहे. प्रत्यक्षात, ही शरणागती आहे की सोयीचे राजकारण, याचे उत्तर काळच देईल.

या फुटीचा सर्वाधिक फटका पंजाबला बसणार आहे. भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील पंजाब सरकारला अस्थिर करण्याचा हा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. संदीप पाठक, विक्रमजीत सहानी आणि हरभजन सिंग यांसारख्या चेहऱ्यांना पंजाबच्या जनतेने मोठ्या आशेने निवडून दिले होते. आता तेच लोक भाजपच्या गोटात गेल्यामुळे पंजाबच्या जनतेमध्ये संतापाची लाट असणे स्वाभाविक आहे. संजय सिंह म्हणतात त्याप्रमाणे, ''पंजाबची जनता गद्दारांना माफ करणार नाही,'' हे वाक्य भावनिकदृष्ट्या बरोबर असले, तरी राजकारणात जनस्मृती अल्पजीवी असते, याचा अनुभव आजवर अनेकदा आला आहे.

भारतीय जनता पार्टीने गेल्या काही वर्षांत प्रादेशिक पक्षांना कमकुवत करण्याचे जे तंत्र अवलंबले आहे, त्यात 'आप' आता बळी ठरली आहे. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यानंतर आता 'आप'च्या खासदारांनी मोदी-शाहांचे नेतृत्व स्वीकारणे, हे भाजपच्या विस्तारवादी धोरणाचे यश आहे. मात्र, यामुळे लोकशाहीतील सक्षम विरोधी पक्षाची जागा रिकामी होत चालली आहे. इलेक्टोरल बाँडवरून भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप करणाऱ्या आम आदमी पार्टीचेच नेते जेव्हा भाजपमध्ये जातात, तेव्हा सामान्य मतदाराचा राजकारणावरील विश्वास उडतो.

संजय सिंह, संत बलबीर सिंग आणि नरेन गुप्ता हे तीनच खासदार आता 'आप'च्या तंबूत उरले आहेत. ही फूट केवळ राज्यसभेपर्यंत मर्यादित राहणार की याचे पडसाद पंजाब आणि दिल्लीच्या विधानसभांमध्येही उमटणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

अरविंद केजरीवाल यांच्या तुरुंगवासानंतर पक्षाची विस्कटलेली घडी सावरण्यात नेतृत्व अपयशी ठरले का? कार्यकर्त्यांपेक्षा नेत्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या की पक्षाला घरघर लागते, हेच यातून सिद्ध होत आहे. जनतेच्या मतांशी प्रतारणा करून पक्षांतर करणाऱ्या नेत्यांना लोकशाहीत 'अपात्र' ठरवण्याऐवजी 'पुरस्कृत' करण्याची पद्धत घातक आहे. आम आदमी पार्टीतील ही फूट म्हणजे केवळ एका पक्षाचे नुकसान नाही, तर ''स्वच्छ राजकारण'' करू पाहणाऱ्या प्रत्येक सामान्य माणसाच्या आशेवर फिरवलेला नांगर आहे. राजकारण हे शेवटी संधीसाधूपणाचेच खेळते मैदान आहे, हे या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले. ७ खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश करून सत्तेची ऊब मिळवली असेलही, पण त्यांनी आपल्या पाठीशी असलेल्या जनाधाराचा विश्वास गमावला आहे. 'गद्दारी' आणि 'मुत्सद्देगिरी' यातील पुसट रेषा ओलांडणाऱ्या या खासदारांना जनता निवडणुकीत काय धडा शिकवते, यावरच देशाच्या राजकारणाची पुढची दिशा ठरेल. थोडक्यात सांगायचे तर, 'झाडू' आता विखुरला आहे आणि तो गोळा करण्याचे आव्हान उरलेल्या तीन खासदारांवर आणि खचलेल्या कार्यकर्त्यांवर आहे.

# मतदान केंद्र बाहेर फटाके वाजवल्याने काही काळ तणाव




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** पोटनिवडणुकीची मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर काही उत्साही कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राच्या गेट जवळच फटाके वाजवल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिस प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यामुळे पुढील अनर्थ टळला ही घटना राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथे घडली.

राहुरी नगर पाथर्डी मतदार संघाच्या पोट निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाच्या वतीने आज दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान प्रक्रिया घेण्यात आली. सर्वत्र दिवसभर शांततेत मतदान प्रक्रिया झाली. मात्र राहुरी तालुक्यातील गोटूंबे आखाडा येथे मतदान केंद्र असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या गेट जवळच मतदान प्रक्रिया पूर्ण होताच ६.१५ वाजे दरम्यान एका पक्षाच्या काही उत्साही कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी केली. यावेळी बंदोबस्तावर असलेले काही पोलीस कर्मचारी फटाके वाजवणाऱ्या कार्यकर्त्यांकडे धावून गेले असता कार्यकर्त्यांनी तेथून पळ काढला. फटाके वाजविल्याने काही काळ त्या ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. यावेळी अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे यांनी तात्काळ आपल्या कार्यकर्त्यांसह त्या ठिकाणी धाव घेतली. यावेळी खेवरे यांनी आक्रमक भूमिका घेत फटाके वाजविणाऱ्या कार्यकर्त्यांना तात्काळ अटक करा. तोपर्यंत मतदान पेट्या येथून हलवू देणार नाही, अशी भूमिका घेतली होती. परिणामी तणाव चांगलाच वाढला होता. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तसेच निवडणुक अधिकारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

रावसाहेब खेवरे व प्रशासन यांच्यात काही वेळ चर्चा झाल्यानंतर रात्री उशिराने मतदान पेट्या तेथून हलविण्यात आल्या. मात्र या घटनेमुळे गोटुंबे आखाडा परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. आता फटाके वाजविणाऱ्या त्या उत्साही कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल होणार का याचीच चर्चा तालुक्यात सुरू आहे.

# '५ नंबर साठवण तलावाचे पाणी पुन्हा येसगावला नेले का?' : सुनील गंगुले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नावरून राजकीय वातावरण तापले असून राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ पदाधिकारी सुनील गंगुले यांनी सत्ताधारी कोल्हे गटावर गंभीर आरोप करत ५ नंबर साठवण तलावाच्या पाण्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

प्रसिद्धी पत्रकाद्वारे गंगुले यांनी म्हटले आहे की, आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नातून कोपरगावचा पाणीप्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला असून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत आहे. मात्र, सत्ताधाऱ्यांकडून पाच नंबर साठवण तलावातून शहराला थेट पाणी येत नसल्याचे विधान करण्यात येत आहे. त्यामुळे या तलावातील पाणी नेमके कुठे जाते, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

यापूर्वी साठवण तलावांच्या खोलीकरणावेळी काही गुप्त पाईपलाईन आढळून आल्या होत्या. त्या माध्यमातून पाणी येसगावकडे वळवले जात असल्याचा संशय व्यक्त करत, आता पुन्हा तशाच प्रकारे पाणी वळवले जात आहे का, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे. याबाबत सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट भूमिका मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. दरम्यान, विकासकामांवरूनही त्यांनी कोल्हे गटावर टीका केली. ६७ कोटींचा निधी परत जाण्यास सत्ताधारीच जबाबदार असल्याचा आरोप करत, या निधीतून होणाऱ्या अनेक कामांपासून नागरिक वंचित राहिल्याचे त्यांनी नमूद केले. शहराच्या विकासाऐवजी आरोप-प्रत्यारोप करण्यात वेळ घालवण्यापेक्षा निधी योग्यरीत्या वापरण्यावर भर द्यावा, असा सल्लाही गंगुले यांनी दिला.

# सोनईत राष्ट्रीय पोषण पंधरवाडा सप्ताह साजरा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** येथील राजलक्ष्मी मंगल कार्यालयात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प वडाळा विभाग सोनई यांचे वतीने आठवा राष्ट्रीय पोषण पंधरवडा उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन आशा लोंढे यांनी अत्यंत नियोजनबद्ध व वाखाणण्याजोगे केले होते.

यावेळी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रत्नाताई विठ्ठलराव लघें पाटील उपस्थित होत्या. तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी भावना पवार, रेखा कुऱ्हे, विमल साळवे, संगीता दळे, कल्याणी कडवे, संचिता नजन,रेणुका गायकवाड उपस्थित होत्या. तसेच भारतीताई कर्डक, उषाताई पवार, नामदेव येळवंडे,तुषार भुसारे,सतीश गडाख, हुसेन सय्यद,ओंकार लोंढे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

शासनाने दिलेल्या विषयाप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकस आहाराचे प्रदर्शन,मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम,गरोदर स्तनदा मातांचे ओटी भरणं तसेच मातांना प्रबोधन अशाप्रकारे संपूर्ण कार्यक्रम पार पडला, यावेळी रत्नाताई लंघे यांनी सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतलेल्या मुलांचे कौतुक केले व शाल पुष्प देऊन गौरवले. यावेळी महावीर रसिकलाल चोपडा,शिवाजी पाटील डोळे,आकाश कारभारी डफाळ, अण्णा पुंजा मोरे यांनी राजगिरा लाडू, गुळ शेंगदाणे, केळी बालकांना खाण्यासाठी लोकसहभाग म्हणून दिली.

यावेळी सोनई करजगांव गटातील अंगणवाडी सेविका व वडाळा प्रकल्पातील सेविका उपस्थित होत्या. त्यांनी अत्यंत परिश्रमाने कार्यक्रम पार पाडण्यास मदत केली.सुषमा ताई सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. रत्नाताई लघें यांच्या हस्ते कार्यक्रमाची सांगता झाली.

# संगमनेर तालुक्यातील दोन जिल्हा परिषद शाळांची 'आदर्श शाळा' योजनेसाठी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये पायाभूत आणि भौतिक सुविधांचा विकास करण्याच्या दृष्टीने आमदार अमोल खताळ यांनी राज्य शासनाकडे सातत्यपूर्ण पाठ पुरावा केला होता. या प्रयत्नांना अखेर यश आले असून राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा विकसित करणे या महत्त्वाकांक्षी योजनेतर्गत संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी आणि तळेगाव दिघे येथील जिल्हा परिषद शाळांची निवड करण्यात आली आहे.



राज्य शासनाने जिल्हा परिषदांच्या शाळांना 'आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्याचे धोरण जाहीर केले होते. त्या अनुषंगाने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी २७ मार्च २०२६ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला.या निर्णयानुसार पहिल्या टप्प्यात राज्यातील एकूण ४७८ शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी व तळेगाव दिघे येथील जिल्हा परिषद शाळांचा समावेश झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या योजनेअंतर्गत निवड झालेल्या शाळांमध्ये आधुनिक वर्गखोल्या, स्वच्छता सुविधा, डिजिटल शिक्षण साधने, क्रीडांगणे तसेच इतर आवश्यक भौतिक सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळण्यास मोठी मदत होणार आहे.

------------

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच उच्च दर्जाच्या शिक्षण सुविधा मिळाव्यात, हा आमचा ठाम उद्देश आहे. जिल्हा परिषद शाळांबद्दल पालकांचा विश्वास अधिक दृढ व्हावा, तसेच विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. चंदनापुरी आणि तळेगाव दिघे येथील शाळांची निवड ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. पुढील काळात संगमनेर तालुक्यातील आणखी शाळांचा या योजनेत समावेश व्हावा यासाठी आम्ही शासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवणार आहोत, जेणेकरून प्रत्येक ग्रामीण विद्यार्थ्याला सक्षम आणि स्पर्धात्मक शिक्षण मिळू शकेल.

**अमोल खताळ**
**आमदार संगमनेर विधानसभा**

# शिवसेना सामाजिक न्याय विभागाला बळ द्या : किशोर वाघमारे यांचे आवाहन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी ।** शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाला अधिक बळ देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाप्रमुख किशोर वाघमारे यांनी केले. तसेच या विभागाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन राज्यसभेच्या खा. ज्योती वाघमारे यांनी दिले. शिर्डी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी किशोर वाघमारे यांनी सामाजिक न्याय विभागाला अधिक सक्षम करण्यासाठी साकडे घालत पक्ष बळकटीसाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. खासदार ज्योती वाघमारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, येणाऱ्या काळात शिर्डी लोकसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचा खासदार निवडून येईल. त्यासाठी कार्यकर्त्यांनी तत्काळ कामाला लागावे. प्रत्येक बूथवर बीएलओच्या समन्वयातून पक्षाचे बीएलए पदाधिकारी नियुक्त करून मतदार याद्यांमधील त्रुटी दूर कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी पक्षवाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय राहावे, असे आवाहन केले. तर कमलाकर कोते यांनी गावागावांत शाखा स्थापन करून एकनाथ शिंदे यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. बैठकीस सुनील वाघमारे, रवींद्र मोरे, नितीन औताडे, सुनिता शेळके, अंतोन भोसले, बाबासाहेब दिवे, उत्तम त्रिभुवन, विजय काळे, महेश देशमुख, शाम गोसावी, सागर बोठे, पूजा सोमवंशी, अक्षय सदाफळ आदींसह अनेक पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विजय काळे यांनी केले.

# अशोक संलग्न शैक्षणिक संस्था स्वमालकीच्या करण्याचा डाव हाणून पाडू : जितेंद्र भोसले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर ।** अशोक कारखान्याशी संलग्न असलेल्या शैक्षणिक संस्थांचे विलगीकरण करून त्या स्वमालकीच्या करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत हा डाव हाणून पाडण्याचा इशारा जितेंद्र भोसले यांनी दिला आहे. तसेच या प्रकरणी साखर आयुक्त व धर्मदाय आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भोसले यांनी सांगितले की, अशोक ग्रामीण शिक्षण संस्था, कृषी औद्योगिक शिक्षण संस्था आणि ॲग्रो इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट या तिन्ही संस्था अशोक कारखान्याशी संलग्न असून त्या सभासदांच्या मालकीच्या आहेत. कारखान्याच्या भागभांडवलातून या संस्थांच्या इमारती व विकासकामे उभारण्यात आली आहेत. त्यामुळे या संस्थांवर सभासदांचाच हक्क असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सदर संस्थांचे उपविधी कारखान्याच्या संचालकांनाच विश्वस्त म्हणून मान्यता देतात. मात्र कारखान्याची सध्याची आर्थिक स्थिती पाहता काहीजण संस्थांचे विलगीकरण करून ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

यासंदर्भात लवकरच सभासदांची बैठक घेऊन पुढील भूमिका निश्चित करण्यात येणार असून, गरज भासल्यास संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही भोसले यांनी दिला आहे.

# चिंचोली फार्मसी येथे ए आयच्या साहाय्याने अध्यापन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकष्ण विखे पाटील आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखालीया प्रशिक्षण कार्यक्रमात देशभरातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी तसेच औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध तज्ज्ञांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक लेखनातील वापर, तसेच संशोधनातील नैतिकता व गुणवत्ता वृद्धी यावर सखोल मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्रात भारतीय औषधशास्त्र शिक्षक संघटनेचे अध्यक्ष डॉ. मिलिंद उमेकर उपस्थित होते. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी व जबाबदारीने वापर करून शैक्षणिक गुणवत्ता आणि संशोधन उत्पादकता वाढविण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. हरुन पटेल यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित औषध शोध प्रक्रियेत होत असलेल्या क्रांतीची माहिती दिली, तर डॉ. संजय तिवारी यांनी औषध संशोधनातील नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. सतीश पोलशेट्टीवार व डॉ. अन्वर शेख यांनी शिक्षण व संशोधनासाठी उपयुक्त एआय-आधारित साधनांची माहिती दिली. तसेच डॉ. तनमयी जोशी यांनी एआय-आधारित नेटवर्क फार्माकॉलॉजीचा नव्या दृष्टीकोनातून याबाबत माहीती दिली. या कार्यक्रमामुळे सहभागींच्या अध्यापन पद्धती, संशोधन कार्य आणि शैक्षणिक लेखनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करण्याची दृष्टी विकसित झाली असून, भविष्यात या प्रशिक्षणाचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या संयोजिका प्राचार्या डॉ. चारुशिला भांगळे, सहसंयोजक डॉ. किरण कोताडे, डॉ. सचिन सोमवंशी व डॉ. अतुल खडसे यांनी हे प्रशिक्षण यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

# राहुरी पोटनिवडणूक: ईव्हीएम स्ट्राँग रूममध्ये प्रशासनाचा कडेकोट बंदोबस्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राज्यात सर्वत्र चर्चेत असलेल्या राहुरी पाथर्डी विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडली . राहुरी मध्ये प्रशासनाने कडे कोट बंदोबस्तात निवडणूक सुरक्षितपणे हाताळली.

निवडणूक प्रक्रिया सर्वत्र शांततेत पार पडली किरकोळ अनुचित प्रकार वगळता कुठेही फार काही घडले नाही. निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर आता नागरिकांसह सर्व राज्याचे लक्ष आता चार मे होणाऱ्या मतमोजणीकडे लागले आहे.

निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर राहुरी कै. रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयात उभारण्यात आलेल्या स्ट्राँग रूममध्ये ईव्हीएम मशीन कडेकोट बंदोबस्त आणि कडक सुरक्षा व्यवस्थेत ठेवण्यात आली आहेत. यामध्ये सात उमेदवारांचे राजकीय भवितव्य मशीनमध्ये बंद झाले असून येत्या ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. व निकालानंतरच सर्व चित्र स्पष्ट होणार आहे.

> राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतदान पेट्या ठेवण्यासाठी कै. रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयात स्ट्राँग रूमसाठी अत्यंत नियोजनबद्ध तीन स्तरांमध्ये सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. मतमोजणीचा निकाल चार मे रोजी होणार असल्याने चार मे पर्यंत या स्ट्राँग रूमची व्यवस्था रात्रंदिवस अत्यंत कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आली आहे.
>
> **संजय ठेंगे**
> **पोलीस निरीक्षक, राहुरी.**

# कोल्हे गटाकडून पाच नंबर तलाव योजनेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव ।** शहरातील पाणीप्रश्न आणि पाच नंबर साठवण तलाव योजनेवरून कोपरगावातील राजकारण पुन्हा तापले असून कोल्हे गटाने आमदार आशुतोष काळे यांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली आहे. पत्रकार परिषदेत माजी नगराध्यक्ष राजेंद्र सोनावणे यांनी शहरविकासाबाबत काळे गटावर गंभीर आरोप करत योजनेतील त्रुटी उघड केल्या.

सोनावणे म्हणाले की, पाच नंबर तलाव योजनेचा मोठा गाजावाजा करण्यात आला, मात्र प्रत्यक्षात नागरिकांना अपेक्षित फायदा झाला नाही. आजही शहरात नियमित पाणीपुरवठा होत नसून नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. योजनेत अपूर्णता असूनही ठेकेदाराला पूर्ण बिले अदा केल्याचा आरोप त्यांनी केला.

अक्षय तृतीयेच्या दिवशी श्री स्वामी समर्थ केंद्रात झालेल्या कार्यक्रमातही काळे गटाच्या नगरसेवकांनी वाद निर्माण केल्याचा आरोप करत त्यांनी धार्मिक कार्यक्रमात अडथळा आणल्याचे नमूद केले. दरम्यान, गेल्या तीन महिन्यांत नगरपालिकेत पारदर्शक कारभार सुरू असून अनेक प्रलंबित मुद्द्यांवर कार्यवाही होत असल्याचा दावा गटनेते प्रसाद आढाव यांनी केला.

५७ कोटी आणि १० कोटींचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वळवण्याच्या निर्णयावरही प्रश्न उपस्थित करत, हा निर्णय कोणाच्या दबावाखाली घेतला गेला, असा सवाल करण्यात आला. तसेच पाईपलाईन, पाण्याच्या टाक्या व हायड्रोलिक चाचणीबाबतही त्रुटी असल्याचे संदीप देवकर यांनी सांगितले.

दरम्यान, विरोधकांनी श्वेतपत्रिकेच्या भीतीने सभेवर बहिष्कार टाकल्याचा आरोप संतोष गंगवाल यांनी केला. यावेळी कोल्हे गटाचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द•ख•ल

### पावसाळा लांबण्याची शक्यता, पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन

**श्रीरामपूर** : एल निनोच्या प्रभावामुळे यंदाच्या मान्सूनवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जून ते ऑगस्ट असे तीन महिने हा प्रभाव असणार आहे. यामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवली जात आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा किटकसरीने वापर करण्या,प्रशाहानाकडून आवाहन केले जात आहे. श्रीरामपूर शहरासह बेलापूर-ऐनतपूर, निपाणीवाडगाव, लोणी, कोल्हार अशा मोठ्यागावांच्या पाणी पुरवठा योजना ह्या कालव्यावर अवलंबून आहेत. ही सर्व गावे मोठ् या लोकसंख्येची आहेत. त्यामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता बघता पाणी कपात व पाणी बचतीचा मार्ग मे महिन्यापासूनच अवलंबला जाणे अपरिहार्य आहे. नागरिकांनीही सदरचे संकट ओळखून पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे. अनेकजण अगंण, रस्ते, वाहने धुण्यासाठी पाणी वापरतात. हे अयोग्य व बेजबाबदारपणाचे आहे, असे कोणी पाण्याचा अपव्यय करीत असेल तर त्यावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे. नागरिकांनी संकटाचे भान ठेवूनच पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे.

### आदर्श विद्या मंदिर शाळेचा स्नेहसंमेलन व निरोप समारंभ उत्साहात



**सोनई** : येथील आदर्श विद्या मंदिर प्राथमिक विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व चौथीतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. संस्थेचे सचिव रविराज पा. गडाख यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा जयश्रीताई गडाख होत्या. मुख्याध्यापक अनिल दरंदले यांनी प्रास्ताविकात शाळेची प्रगती व वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. श्लोक, वक्तृत्व, चित्रकला, क्रीडा व वेशभूषा स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, ट्रॉफी व पदक देऊन गौरविण्यात आले. निरोप समारंभात शिक्षिका प्रियंका काळे यांनी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनीही यावेळी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम मुख्याध्यापक अनिल दरंदले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सूत्रसंचालन कावेरी मते व शरद सोनवणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शैला गायवळ यांनी मानले. कार्यक्रमास पालक व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

### वेदमूर्ती परीक्षेत तनय नवले प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



**राहुरी** : राहुरी तालुक्यातील कणगर येथील तनय प्रकाश नवले याने श्री क्षेत्र मोशी (आळंदी) येथे आयोजित वेदमुर्ती परीक्षेत प्रथम श्रेणीत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अचूक, स्वच्छ आणि प्रभावी वेद उच्चारांनी परीक्षकांवर ठसा उमटवत तनयने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याच्या या उज्ज्वल कामगिरीमुळे संपूर्ण परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. तनय हा वेदसंपन्न प्रकाश नवले गुरु यांचा सुपुत्र असून प्रवीण नवले गुरु यांचा पुतण्या आहे. घरातील वैदिक परंपरेचा वारसा आणि स्वतःची जिद्द याच्या जोरावर त्याने हे यश गाठले. ही वेदमुर्ती परीक्षा स्वामी गोविंदगिरीजी महाराज यांच्या अधिपत्याखाली संपन्न झाली. या प्रवासात तनयला गोविंद जोशी(औंढा नागनाथ) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### सकल वारकरी समाजाच्या वतीने लवांडे यांच्या वक्तव्याचा राहात्यात निषेध

**शिर्डी** : वारकरी संप्रदाय ही वैदिक धर्माचीच एक सुधारित शाखा असून धर्मामध्ये फूट पाडण्यासाठीच अशी वक्तव्ये करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निषेधार्थ राहाता सकल वारकरी समाज प्रवरा परिसराच्यावतीने एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करत निषेध नोंदवला आहे. संतांनी वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसारासाठी आपले आयुष्य वेचले, ज्या संतांनी समाजाची जडणघडण केली अशा संतावर ते घुसखोरी व हिंसेला प्राधान्य देतात. अशी वक्तव्ये सदर व्यक्तीकडून करण्यात आली. घुसखोर म्हणण्याच्या यांना अधिकार काय ? याबाबत जे काही निर्णय घेतील ते आमच्या वारकरी संप्रदायातील आचार्य ठरवतील, याविषयी ज्यांना ज्ञान नाही त्यांनी वारकरी संप्रदायाविषयी बोलू नये असे वक्तव्ये करणाऱ्याचा आम्ही निषेध करत असल्याचे हर्षद महाराज भागवत, लक्ष्मण महाराज पानसरे, वेनुनाथ महाराज विखे, शिवा महाराज लांबे, शिवाजी महाराज तांबे, शेळके महाराज, किशोर महाराज, ज्ञानदेव पानसरे, बळीराजा पार्टीचे जिल्हाध्यक्ष शिवाजी कवडे यांनी केला आहे.

# राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रा : ना. विखे

## जोर्वे येथे प्रवरा पाण्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते जलपूजन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या व्यापक प्रयत्नांना ‘गोदा ते नर्मदा’ जलयात्रा मोठे पाठबळ देणारी ठरेल, असा ठाम विश्वास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. संगमनेर तालुक्यातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या श्री क्षेत्र जोर्वे येथे राज्याचे जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते प्रवरा नदीच्या पाण्याचे विधीवत पूजन करण्यात आले.

या वेळी त्यांनी जलकलश विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्त केला आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. यात्रेचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना नामदार विखे पाटील म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ आध्यात्मिक क्षेत्रातच नव्हे, तर एक कुशल प्रशासक म्हणून जलव्यवस्थापन आणि जलसंवर्धनात दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या याच कार्याची प्रेरणा घेऊन लोकसहभागातून राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी शासन कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले

जलसंपदा विभागाच्या वतीने राज्यात प्रथमच अशा अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रमुख ३० नद्यांचे जलकलश एकत्रित करून ते शिर्डीमध्ये संकलित केले जातील. त्यानंतर ही जलयात्रा नर्मदा नदीच्या दिशेने प्रस्थान करेल, अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

या जलयात्रेचे उद्या शनिवारी सायंकाळी ६ वाजता संगमनेर शहरातील घुलेवाडी फाटा या ठिकाणी संगमनेर तालुक्याचे आ. अमोल खताळ हे जलयात्रेचे स्वागत करणार आहे. या जलयात्रेची शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. अहिल्यादेवींनी जीर्णोध्दार केलेल्या शहरातील ऐतिहासिक श्रीराम मंदिरात महाआरती होणार आहे. त्यानंतर रविवारी प्रवरामाईचे पूजन करून जलकलश यात्रेत सहभागी होईल.

दरम्यान या कार्यक्रमाप्रसंगी ज्येष्ठ नेते शाळीग्राम होडगर, जोर्वे च्या सरपंच प्रिती दिघे, भाजप अश्वी मंडलाध्यक्ष गोकुळ दिघे, शिवाजी कोल्हे, रोहिणी निघुते, रामभाऊ भुसाळ तसेच जल संपदा विभागाचे अधिकारी अमोल कवडे अधिकारी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विकास लवांडेस न्यायालयाकडून कारणे दाखवा नोटीस

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रवक्ते यांनी दिनांक १६ एप्रिल रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस (श प) गटाचे ऑफिस मध्ये पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रातील २० संत महंत यांचेवर विविध आरोप करून त्यांना घुसखोर म्हणून जाहीर केले व त्यांचेवर प्रतिगामी असा ठपका लावून बदनामी केली. तसेच त्यानंतर ही फेसबुक पेज चे माध्यमातून बदनामी सुरू ठेवली.यावरून नेवासा न्यायालयाने विकास लवांडे यास कारणे दाखवा नोटीस बजावली आहे

नेवासा येथील विश्व हिंदु परिषदेचे जिल्हा धर्माचार्य संपर्क प्रमुख प्रशांत बहिरट यांनी नेवासा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करून घेण्याची विनंती केली, नेवासा पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून घेतला.

सदर व्यक्तिविरुद्ध एफ आय आर दाखल करून तपास व्हावा म्हणून नेवासा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वर्ग १ यांचे न्यायालयात प्रायव्हेट कंप्लेंट दाखल करण्यात आली असून त्याचा नंबर इतर किरकोळ फौजदारी चौकशी अर्ज नंबर ९८/२०२६ असा असून सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायाधीश एल ए काळे यांचे समोर सुनावणीस आले असता अँड. मयूर वाखुरे यांनी प्राथमिक युक्तिवाद केल्यानंतर सदर प्रकरणात विकास लवांडे यांना कारणे दाखवा नोटीसचा आदेश पारित करण्यात आला आहे.

विकास लवांडे यांना नेवासा न्यायालयात हजर राहून त्यांची बाजू मांडावी लागणार आहे. या प्रकरणात पुढील तारीख २२ मे पडली असून, विकास लवांडे हजर राहणार का यावर चर्चा रंगली आहे.. सदर नोटीस निघाल्याने सकल हिंदू समाजाचे वतीने समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# गोमांस वाहतुकीवर छापा; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील ममदापूर गावाच्या हद्दीत गोमांसाची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांविरोधात लोणी पोलीस स्टेशनकडून मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ८ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी विशेष पथकाची स्थापना केली होती. पोलीस हवालदार संजय विखे, साईनाथ रशिनकर, अविनाश मकासरे यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड यांच्या मदतीने परिसरात गस्त वाढवण्यात आली होती.

ममदापूर येथे गोमांस वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. या कारवाईदरम्यान दोन चारचाकी वाहनांमधून मोठ्या प्रमाणात गोमांस वाहतूक होत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी तत्काळ वाहनांसह गोमांस जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ८ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी आयान जब्बार कुरेशी (वय २९, रा. ममदापूर, ता. राहाता) याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर गोमांस वाहतुकीवर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या आदेशानुसार पार पडली.

# धनगरवाडी सप्ताहासाठी सर्वांनी सहकार्य करावे : रामगिरीजी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वाकडी** : राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या सद्गुरु गंगागिरी महाराजांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सराला बेटाचे प्रमुख महंत रामगिरी महाराज यांनी सप्ताह स्थळाची पाहणी केली. यावेळी पंचक्रोशीतील २० ते २५ गावांच्या प्रतिनिधींसह त्यांनी आढावा घेत भाविकांशी संवाद साधला. मार्गदर्शन करताना रामगिरी महाराज म्हणाले की, सप्ताह हे एकट्या व्यक्तीचे काम नसून सामूहिक प्रयत्नातूनच ते यशस्वी होते. पूर्वी सद्गुरु गंगागिरी महाराज भाकरी गोळा करून सप्ताह करीत असत. आजही ती परंपरा टिकून असून, सप्ताह द्विशताब्दीकडे वाटचाल करत आहे. प्रत्येक गावाने पुढाकार घेत वर्गणी गोळा करून या धार्मिक कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

सप्ताहाच्या आयोजनात आधुनिकतेची जोड मिळाली असली तरी त्यामागील भक्तीभाव कायम असल्याचे त्यांनी नमूद केले. १८९५ साली पंढरपूर येथे झालेल्या सप्ताहात ७०० पोती साखरेचे लाडू तयार केल्याचा उल्लेख करत त्यांनी त्या परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. दरम्यान, गणेशनगरचे रुपेंद्र काले यांनी धनगरवाडी परिसरातील कच्चे रस्ते पावसाळ्यापूर्वी पक्के करण्याची मागणी केली. भाविकांच्या सोयीसाठी लोकप्रतिनिधींनी तत्काळ लक्ष द्यावे, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास पंचक्रोशीतील अनेक गावांचे प्रतिनिधी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांदा उत्पादक अडचणीत; एकरी ५० हजार अनुदानाची मागणी : अनिल औताडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिरसगाव** : राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी सध्या अभूतपूर्व संकटात सापडले असून केंद्र व राज्य सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी केली आहे. एकरी किमान ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. औताडे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, मागील वीस वर्षांत कांदा उत्पादकांवर इतकी बिकट परिस्थिती कधीही आली नव्हती. सध्याच्या स्थितीत एकरी १२ टन उत्पादन गृहित धरल्यास आणि प्रतिकिलो पाच रुपये दर मिळाल्यास केवळ ६० हजार रुपये उत्पन्न मिळते.

मात्र उत्पादन खर्च सुमारे एक लाख रुपये होत असल्याने शेतकऱ्यांना प्रति एकर सुमारे ४० हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. शेतकरी आधीच कर्जबाजारी असून कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहे. अनेकांनी कृषी सेवा केंद्रांकडून उधारीवर बियाणे व खते घेतली आहेत. मजुरांचा तुटवडा आणि वाढलेला मजुरी खर्च यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. काढलेला कांदा शेतातच पडून असून अवकाळी पावसामुळे तो झाकण्यासाठी एकरी १५ हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च येत आहे.

प्लास्टिक बारदाना व गोण्यांच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत व्यापारी कमी दरातही कांदा खरेदी करण्यास तयार नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अनुदान द्यावे, तसेच शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, राज्य सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. बैठकीस शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकावर राज्यसचिव रुपेंद्र काले, राज्य प्रसिद्धीप्रमुख नानासाहेब जवरे, जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तुवर श्रीरामपूर तालुका अध्यक्ष युवराज जगताप, जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे,नेवासा तालुका अध्यक्ष अशोक काळे, राहुरी तालुका अध्यक्ष नारायण टेकाळे, सुदामराव औताडे, डॉ दादासाहेब आदिक, डॉ विकास नवले, शरद पवार, बबनराव उघडे,साहेबराव चोरमल, कार्लस साठे, प्रशांत कापसे, बंडूपंत चौगुले ,अँड कडू पवार, भास्कर तूवर, डॉ रोहित कुलकर्णी इंद्रभान चोरमल, नारायण पवार, दिलीप औताडे, शैलेश वमने, बंडू पटारे, गोविंद वाघ, शिवाजी पठारे, सतीश नाईक, सागर गीऱ्हे शरद आसने , संतोष पटारे, अरुण कवडे, शिवाजी दांगट, सर्जेराव देवकर, बाळासाहेब मुरकुटे, अरुण मुठे, सुजित बोडखे, कैलास पवार, अशोक टेकाळे, बाबासाहेब वेताळ ,सचिन वेताळ , सोपान येले, कैलास येलेआदी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी झालेल्या बैठकीत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# भोंदू राजेंद्र गडगेची पोलीस कोठडी २७ एप्रिलपर्यंत वाढवली



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील वडगाव पाणी येथील दत्ता धाम आश्रमाचा प्रमुख भोंदू बाबा राजेंद्र बापू गडगे याला न्यायालयाने पुन्हा २७ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. भोंदूबाबा राजेंद्र गडगे हा सध्या संगमनेरच्या कारागृहामधील पोलीस कोठडीत आहे त्याच्या ५ दिवसाच्या पोलीस कोठडीची मुदत संपली त्या मुळे गुरुवारी त्याला जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले होते.

त्यावेळी भोंदू बाबा गडगे याच्या कडून आणखी काही महत्त्वाचे पुरावे गोळा करणे बाकी आहे त्यामुळेप त्याच्या पोलीस कोठडीत वाढ करावी असा युक्तिवाद पोलीस प्रशासनाने न्यायालयात केला न्यायालयाने पोलीस प्रशासनाचा युक्तिवाद ग्राह्य धरत अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाल यामध्ये गडगे यांच्या पोलीस कोठडी मध्ये आणखी चार दिवसांची वाढ केली.

### पीसीपीएनडीटी ॲक्टअंतर्गत आणखी एका गुन्ह्याची प्रक्रिया सुरू

भोंदू बाबा राजेंद्र गडगे याने अपत्य प्राप्तीबाबत मुलगाच होईल असा दावा केल्याप्रकरणी पीसीपीएनडीटी ॲक्टअंतर्गत आणखी एक गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या संदर्भातील व्हिडीओ चित्रीकरण करणाऱ्या व्यक्तीलाही घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षकांनी चौकशीसाठी पाचारण केले असल्याची माहिती समोर आली आहे.

# गणेशवाडी अमरधाममध्ये सुविधांचा अभाव

## मोबाईलच्या टॉर्चने अंत्यविधी करण्याची वेळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनई** : नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथील स्मशानभूमीतील असलेल्या सुविधेचा अभाव मुळे नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करून संबंधित विभागाला ग्रामस्थांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. सदरचे निवेदन गणेशवाडी सेवा सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अक्षय लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी सह्याने देण्यात आले आहे. अंत्यविधी हा दिवसा -रात्री करण्यात येत असल्यामुळे तेथील जागेत ग्रामस्थांना, नातेवाईकांना, बसण्याची, लाईटची, श्रद्धांजली वाहण्यासाठी व रक्षा सावरण्याचा विधी, सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपक नसणे, अस्वच्छता, प्रवेश द्वार आदी सुविधा नसल्याने नागरिकांना मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात अंत्यविधी होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

मृत्यूनंतरही अशी व्यवस्था असेल तर बाकी विचारायला नको, अशी प्रतिक्रिया डॉ. लोहकरे यांनी दिली. तरी स्मशानभूमी मध्ये पुरेसा लाईट व्यवस्था, गेटची झालेली दुरावस्था, महिला व पुरुषांना बसण्याची व्यवस्था, तेथील कचराची विल्हेवाट लावण्यासाठी व्यवस्था केली तर तेथे स्वच्छता आपोआप होण्यास मदत होईल.तेथील अशा अनेक अडचणी सोडवण्याची मागणीचे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्या नगर, व गटविकास अधिकारी, नेवासा यांना देण्यात आले आहे.

# ‘जनगणना’ महायज्ञाचा श्रीरामपूर तालुक्यात ‘श्रीगणेशा’

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यात देशाच्या विकासाचा पाया ठरणाऱ्या जनगणना मोहिमेचा येथील सी. डी. जैन वाणिज्य महाविद्यालयात प्रगणकांच्या बैठकीत उत्साहात शुभारंभ झाला. ही मोहीम केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून भविष्यातील नियोजनासाठी महत्त्वाची असल्याने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. या मोहिमेसाठी ३९० प्रगणक नियुक्त करण्यात आले असून त्यांचे प्रशिक्षण २३ एप्रिल ते ८ मे दरम्यान पाच टप्प्यांत होणार आहे. यंदा जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने होणार असल्याने ती अधिक अचूक आणि गतिमान ठरेल. शहरातील १५६ वॉर्ड आणि ग्रामीण भागातील ५२ गावांतील २९१ क्षेत्रांमध्ये प्रत्येक घरापर्यंत प्रगणक पोहोचणार आहेत. प्रशिक्षणासाठी ग्रामीण भागासाठी सी. डी. जैन वाणिज्य महाविद्यालय आणि शहरासाठी भी. रा. खटोड कन्या विद्यालय ही केंद्रे निश्चित केली आहेत. नागरिकांची माहिती पूर्णपणे सुरक्षित व गोपनीय ठेवली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रगणकांकडे अधिकृत ओळखपत्र असणार असून नागरिकांना ‘स्वगणना’चा पर्यायही उपलब्ध आहे. १ मे ते १५ मेदरम्यान नागरिक ऑनलाइन माहिती भरू शकतात. या मोहिमेचे नेतृत्व विभागीय चार्ज अधिकारी प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ आणि मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप करत आहेत. त्यांकामी नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, उपमुख्याधिकारी महेंद्र तापकिरे, सहा. महसूल अधिकारी निलेश इंगळे, माष्टर ट्रेनर गणेश पिंगळे, योगेश राणे, सचिनकुमार शिंदे, निलेश राजवाळ यांची तज्ञ टीम कार्यरत आहे.

## पान १ वरुन

### समतेच्या नावाखाली सहकारात घोटाळ्यांचा 'आदर्श'

निघालेली खाती आणि कोट्यवधी रुपयांचे व्यवहार, हे याचे जिवंत उदाहरण आहे. समता पतसंस्थेत वेगवेगळ्या नावावर शेकडो खाते, आणि वारस केवळ अशोक खरात. ते खाते देखील खरातच्याच वापरात होते. ज्यांच्या नावावर ते खाते आहेत त्यांना ते माहीतच नसल्याचा खुलासा चाकणकर यांनी केला. त्यानंतर देखील सर्व काही अलबेल असल्याचे भासवले जात असेल, आणि सहकारातील अधिकारी तक्रारीची वाट पाहत असतील, तर कुणाकुणाचे हात दगडाखाली अडकलेले असतील, याचा अंदाज कोणीही बांधू शकतो. दुसरीकडे, अनेक ठेवीदारांना माहीतच नसते की त्यांच्या नावे कोट्यवधींच्या ठेवी मल्टिस्टेटमध्ये पडल्या आहेत. हे पैसे नेमके कोणाचे? हवाला किंवा काळा पैसा पांढरा करण्यासाठी या संस्थांचा वापर होत आहे का? हे आता तपासाचे मुख्य केंद्र बनले आहे. मोठे पोलीस अधिकारी, महसूल अधिकारी यांना बोलावून सत्कार समारंभ घडवून आणणे, हा जनतेला भुलवण्याचा एक मार्ग बनला आहे.

वरपर्यंत ओळखी आहेत हे दाखवून सामान्य ठेवीदाराचा विश्वास संपादन केला जातो आणि त्याच विश्वासावर डल्ला मारला जातो, ही समान कार्यपद्धती..! साईबाबांच्या शिर्डी परिसरासह राहता, राहुरी आणि नेवासा पट्ट्यातील मल्टिस्टेट सोसायट्या आता केंद्रीय तपास यंत्रणांच्या (ईडी) रडारवर आहेत. एका पतसंस्थेच्या प्रमुखाने आपल्या मित्राच्या नावावर चक्क 'हेलिकॉप्टर' खरेदी केल्याची चर्चा जिल्ह्यात जोरात आहे. ज्या भागात शेतकऱ्याला बँकेचे कर्ज मिळताना नाकीनऊ येते, तिथे पतसंस्थांच्या प्रमुखांकडे आणि त्यांच्या नातेवाईकांकडे अशी अफाट संपत्ती येते कोठून? बोगस केवायसी करून ठेवलेल्या ठेवी आणि नाशिकमधील एका नेत्याच्या नातेवाईकाच्या नावावर सुरू असलेला गोंधळ, यामुळे या संस्थांवर कोणत्याही क्षणी 'ईडी'ची वक्रदृष्टी पडण्याची शक्यता आहे. काका कोयटे यांनी वयोमर्यादेचे कारण देऊन राजीनामा दिला असला, तरी सहकार वर्तुळातील चर्चा काही वेगळीच सुचवत आहे. 'समता' मधील खरातचा पैसा आणखी कुठे कुठे फिरला, याचा शोध पोलीस घेत आहेत. जेव्हा संस्थांचा 'आदर्श' संपतो आणि केवळ 'प्रेरणा' घोटाळ्यांचीच उरते, तेव्हा सहकार चळवळ धोक्यात येते. सामान्यांनी केवळ भव्य इमारती आणि अधिकाऱ्यांच्या सत्काराला भुलून आपले कष्टाचे पैसे गुंतवू नयेत. सहकार हा 'संस्कार' असायला हवा, पण दुर्दैवाने तो आज काही जणांसाठी स्वार्थाचे 'कुरण' बनला आहे. अशा वेळी आपला पैसा वाचवण्यासाठी 'जागरूकता' हेच एकमेव शस्त्र आहे.

### 'बाळूमामाचा अवतार' मनोहर भोसले अटकेत!

फसवणूक आणि भोंदूगिरी केल्याचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मनोहर भोसले याच्यावर अत्याचारच्या आरोपाव्यतिरिक्त, कॅन्सरसारखे गंभीर आजार बरे करण्याचे खोटे आश्वासन देऊन भक्तांची आर्थिक फसवणूक केल्याचं आरोप आहे. अत्याचार प्रकरणी अटकेत असताना बार्शी सत्र न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता. सध्या देखील तो जामीनावर आहे. व्यवसाय उद्योगात भरभराट आणायचे असेल तर पूजाअर्चा केली पाहिजे, असे सांगून मनोहर मामा भोसले याने दोन लाख रुपयाची एका भक्ताकडे मागणी केली होती. यामध्ये संबंधित भक्ताने ५० हजार रुपये मनोहर मामा भोसले आणि त्यांच्या साथीदाराकडे दिले होते. ५० हजार रुपये दिल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर याबाबत कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात मनोहर मामा भोसले आणि एकविरोधात आर्थिक फसवणूक आणि जादूटोणा, अंधश्रद्धा निर्मूलन गुन्हे अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. याच गुन्ह्यामध्ये कुर्डूवाडी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल मोहिते यांच्या पथकाने मनोहर मामा भोसले यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

# महिला सन्मान होणे काळाची गरज ; आ. हेमंत ओगले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : महिला सन्मान होणे काळजी गरज आहे. स्त्री- पुरुष भेदभाव न करता पुरुषांच्या बरोबरीने कार्य करणाऱ्या प्रत्येक महिलेचा सन्मान अपेक्षित असल्याचे मत आ. हेमंत ओगले यांनी केले आहे.

श्रीरामपूर नगरपरिषद आयोजित सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमामध्ये आमदार ओगले बोलत होते. ते यावेळी म्हणाले की, श्रीरामपूर नगर परिषदेने अतिशय स्तुत्य उपक्रम केला मी त्यांना मनापासून धन्यवाद देत असल्याचे म्हटले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे होत्या तर प्रमुख उपस्थिती सिने अभिनेत्री जान्हवी किल्लेकर यांची होती. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, श्रीरामपूर नगर परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सन्मानाने शक्तीचा



या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तळागाळातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ज्यांनी कार्य केले त्या महिलांचा सन्मान करण्याचा प्रयत्न नगर परिषदेने केला आहे या पुढील काळात देखील श्रीरामपूर नगरपालिका महिला सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन गुजर म्हणाले की, माजी आ. स्व. जयंतराव ससाणे यांनी श्रीरामपूर येथे महिला दिनाच्या निमित्ताने भव्य - दिव्य कार्यक्रम घेतले आज नगरध्यक्ष करण ससाणे आणि त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांनी त्याच प्रकारे कार्यक्रमाचे आयोजन करून महिला सन्मान केला त्यांचे आभार व्यक्त करतो असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक महिला बालकल्याण समितीच्या सभापती मंजुश्री मुरकुटे यांनी केले. तर स्वागत उपनगराध्यक्ष कांचन सानप यांनी केले. आभार उपसभापती रागेश्वरी एडके यांनी व्यक्त केले.

यावेळी मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सभापती सुधीर नवले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, आशाताई दिघे, गटनेत्या वैशाली चव्हाण, नगरसेविका निलोफर शेख, जायदाभी कुरेशी, प्रणिती चव्हाण, सोनिया कक्कड, नवनीतकौर सेठी, जाकीया शेख, शहाला शहा, यास्मिन शेख, वैशाली पोटे, जयश्री पाटील, आशाताई परदेशी, योगिता नागले, स्नेहल खोरे, सभापती राजेंद्र पवार, दिपक वमने, योगेश जाधव, गोपाल लिंगायत, माजी नगरसेविका मंगल तोरणे, संगीता मंडलिक, सुधा कांबळे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीरामपूरातील प्रतीक्षा कोते, कलावती देशमुख, तेजस्वी शिंगारे, डॉ. मोहम्मदी शेख, प्रियंका निकम, विमल गिरमे, मीलाग्रीन कदम, मोनिका जैन, कोमल चौधरी, छाया भोसले, अनिता गायकवाड, दीपा भवर, योगिता महाले, तेजश्री डोखे, कल्पना शेलार, प्रियंका भिसे, शितलकौर टाक, कृष्णमाई भजनी मंडळ या महिलांना नारी शक्ती पुरस्काराने सन्मानानीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष मते यांनी केले.

## उच्चदाब मनोऱ्यांखाली झाडतोडीला विरोध

### शेतकरी दाम्पत्यावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर ।** तालुक्यातील संजरपूर शिवारात उच्चदाब विद्युत मनोऱ्यांखालील झाडे तोडण्यास विरोध केल्याप्रकरणी शेतकरी दाम्पत्याविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय कामात अडथळा आणणे, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे. याबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता अश्विनी आशीष जोशी (महापारेषण) यांनी तक्रार दिली आहे. त्या ४०० केव्ही एकतूनी–बाभळेश्वर विद्युत वाहिनी प्रकल्पावर कार्यरत आहेत. तक्रारीनुसार, मंगळवारी (दि. २१) दुपारी संजरपूर शिवारातील गट क्रमांक ७ मध्ये मनोरा क्रमांक १९६–१९७ दरम्यान वाढलेल्या जंगली झाडांची तोड करण्यासाठी त्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी गेल्या होत्या. विद्युत वाहिनीला धोका निर्माण होऊ नये व वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी महापारेषणकडून ही कारवाई सुरू होती. यावेळी शेजारील जमीनधारक सखाराम दशरथ सुकासे व त्यांच्या पत्नीने झाडतोडीला विरोध करत अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे.

## अ.भा.श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटनेच्या वतीने तरुणांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** येथील अखिल भारतीय श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटना यांच्या वतीने शासकीय सेवेतील विविध पदावर निवड झालेल्या तरुण युवकांचा सत्कार महादेव मंदिराच्या प्रांगणामध्ये नुकताच संपन्न झाला. यावेळी कार्यक्रम प्रसंगी अखिल भारतीय श्रीकृष्ण गोपाळ समाज संघटनेचे पदाधिकारी व गावातील तरुण युवक उपस्थित होते. याप्रसंगी दीपक ब्राह्मणे(पुणे शहर पोलीस पोलिस) प्रमोद कलंके(पुणे लोहमार्ग पोलीस) राहुल औटी(पुणे शहर पोलीस) सोपान बनकर (अहिल्यानगर पोलीस) मेजर महेश गव्हाणे आदि युवकांचा पोलीस दल व विविध निवड झाल्याबद्दल समाजाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी अखिल भारतीय श्रीकृष्ण गोपाळ संघटनेचे राज्य क्रीडा अध्यक्ष भाऊसाहेब गव्हाणे, टाकळीभान अखिल भारतीय गोपाळ समाज अध्यक्ष शहादेव ब्राह्मणे, उपाध्यक्ष बाळासाहेब सावंत खजिनदार गणेश सावंत, शिवनाथ पवार



,कानिफनाथ जाधव , दादासाहेब सावंत ,गव्हाणे मिस्तरी, किरण ब्राह्मणे तालुका संघटक, जिल्हा क्रीडा अध्यक्ष पंकज जाधव ,श्रीरामपूर तालुका अध्यक्ष विठ्ठल जाधव, गोरक्षनाथ सावंत बाबासाहेब सावंत दीपक ब्राह्मणे श्रीराम संघाचे मनोज पवार,प्रवीण ब्राह्मणे आदीसह समाज बांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन राऊत यांनी केले तर भाऊसाहेब गव्हाणे यांनी आभार मानले.

# आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील विकासकामांना गती

## दिलीप वळसे-पाटील यांची मुख्यमंत्र्यांशी भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे/कवठे येमाई :** आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नुकतीच मुंबई येथे भेट घेतली. या भेटीत सिंचन,पाणीपुरवठा,वीज आणि आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. कुकडी प्रकल्पातील महत्त्वाचे डिंभे धरण सुरक्षिततेचा प्रश्न या बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. धरणातून होत असलेली गळती थांबवण्यासाठी १७१.५९ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार असून त्याला तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी करण्यात आली. यामुळे धरणाचे आयुष्य वाढण्यास आणि भविष्यातील संभाव्य धोका टाळण्यास






मदत होणार आहे.आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात अखंडित वीज पुरवठ्यासाठी डिंभे येथे ३३/११ के.व्ही. उप केंद्र उभारण्याची गरज ही अधोरेखित करण्यात आली. यासाठी जलसंपदा विभागाची जमीन महावितरणकडे हस्तांतरित करून प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची विनंती करण्यात आली. मंचर शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता १३३.५१ कोटी रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेलाही तातडीने मंजुरी देण्याचा मुद्दा मांडण्यात आला.या योजनेमुळे भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय होण्याची अपेक्षा आहे.धामणी परिसरातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून पूर्ण केलेल्या ९ उपसा सिंचन योजनांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नाही. त्यामुळे सुमारे १२०० एकर क्षेत्र ओलिताखाली येण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या योजनांना तातडीने वीज पुरवठा देण्याचे निर्देश देण्याची मागणी ही वळसे पाटील यांनी यावेळी केली. तसेच कुकडी प्रकल्पांतर्गत कळमजाई, बोरघर आणि फुलवडे या तीन नवीन उपसा सिंचन योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ही चर्चा झाली. या योजनांमुळे सुमारे १५८५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून आदिवासी भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि भीमाशंकर तीर्थक्षेत्राचा विकास हे आमचे प्राधान्य आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सर्व विषयांवर सकारात्मक भूमिका घेतली आहे, असे आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी बोलताना सांगितले.

## निधन वार्ता

### दामोधर खाकाळ



**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील अशोक नगर येथील दामोधर सिताराम खाकाळ (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्याच्या पश्चात सात मुली, जावई, भाऊ, भावजय, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. मुठेवडगांव येथील गौरी महिला उद्योग समूहाच्या शितल राजेंद्र वाळुंज याचे ते वडील होत.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME SAMREEN BANO NISAR SHAIKH ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SAMREENBANO ASIF SHAIKH (AADHAR NO. 7136 7485 7412) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR

PLACE: SHRIRAMPUR

DATE : 24/04/2026

## संजीवनीच्या आठ विद्यार्थ्यांची तैवानच्या विद्यापीठांत इंटर्नशिपसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव :** संजीवनी युनिव्हर्सिटी, संजीवनी फार्मसी महाविद्यालय आणि संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज मधिल एकुण आठ विद्यार्थ्यांची तैवान मधिल विद्यापीठांमध्ये ४ ते ६ महिने कालावधिच्या इंटर्नशिपसाठी (आंतरवासिता) संधी मिळाली. त्यासाठी त्यांना तैवान मधिल विद्यापीठांकडून शिष्यवृत्ती देखील देण्यात आली आहे. संजीवनी इंटरनॅशनल रिलेशन्स विभागाच्या पुढाकारातून या विध्यार्थ्यांना ही संधी मिळाली. आजवर अनेक विध्यार्थ्यांना अशा स्वरूपाची संधी मिळाली आहे.

हे विद्यार्थी तेथिल विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आपापल्या



क्षेत्रातील संशोधन करतील. निवड झालेल्या विद्यार्थ्यांत संजीवनी युनिव्हर्सिटीच्या कल्याणी रामदास पोपळघट व संकेत सुनिल गायकवाड यांची, संजीवनी फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथमेश राजेंद्र अंब्रे याची, श्रावणी संजय खडांगळे, गायत्री आप्पासाहेब वक्ते व पुष्कर दिपक मुथ्था यांची, संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या युवराज विजय राजुरे व अंजली चंद्रभान सोनवणे यांचा समावेश आहे.संजीवनी इंटरनॅशनल विभागाच्या वतीने विदेशातील नामांकित विद्यापिठात विध्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह इंटर्नशिपची संधी मिळावी यासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले जातात. त्यामुळे त्यांना आर्थिक अडचणींचा अडथळा न येता आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण व संशोधनाचा अनुभव घेता येतो. आज पर्यंत तैवान, कॅनडा, फिलिपाईन्स, रशिया, ट्युनिसिया, युनायटेड किंगडम, अशा विविध देशातील नामांकित विद्यापीठांत येथील विध्यार्थ्यांना ही संधी मिळाली.

संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी पालकांसह या विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

यावेळी व्हाईस चांसलर डॉ. ए.जी.ठाकुर, डॉ. आर. एस. शेंडगे , डॉ. आर. ए. कापगते, डॉ. विपुल पटेल, डॉ. कविथा राणी, डॉ. माधुरी जावळे, डॉ. महेंद्र गवळी व प्रा. प्रेरणा जाधव उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी यांच्याकडून आषाढी वारीसाठी पालखी मार्गावरील सोयीसुविधांचा आढावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर देहू येथून निघणाऱ्या जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी, आळंदी येथून निघणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तसेच सासवड येथून प्रस्थान करणाऱ्या संत सोपानदेव पालखी सोहळ्यांच्या मार्गावरील रस्ते, मुक्कामस्थळे व सोयीसुविधांबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज आढावा घेतला. वारकऱ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी यापूर्वी २१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी कितपत झाली याचाही सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील ईनामदार वाडा परिसरातील रस्ता रुंदीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. देहू कॅन्टोन्मेंट हद्दीतील खराब रस्त्याची दुरुस्ती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत, कॅन्टोन्मेंट बोर्डाची नाहरकत घेऊन तातडीने करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

**change of name**

Old name: SHAINBANU JAMILKHA PATHAN IS ON MY SCHOOL LIVING CERTIFICATE. and My New Name is SHAHIN RASHID SHAIKH as on Aadhar Card Number is 2730 4740 3047 (20/04/2026)

## नशिबाची परिक्षा

**शनिवार दि .२५ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४० २३० ७८० | ५-१ | १२८ २९० २२७ | जोड ५७-४१-९० ३६-१८ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ३४४ | १-० | १९० २८० ५५० | जोड १३-८०-२४-३७-०९ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२४ ४६७ ७०० | ७-२ | १५४ १२४ ११० | जोड ७४-१२-३५ ९८-२३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा

## ध्रुव स्कूलच्या विद्यार्थिनींना राष्ट्रीय पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर ।** शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात नाव कमावणाऱ्या ध्रुव ग्लोबल स्कूलच्या दोन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश मिळवले आहे. यशोधरा लक्ष्मीकांत नाईकवाडी व आराध्या जनार्दन पुजारी यांची 'नृत्यकला भूषण बाल पुरस्कार २०२६' साठी निवड झाली असून, त्यांच्या या कामगिरीमुळे संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

'कल्चरल फाऊंडेशन ऑफ इंडिया'तर्फे दिल्या जाणाऱ्या या राष्ट्रीय पुरस्कारासाठी



देशभरातील विद्यार्थ्यांमधून कठोर निवड प्रक्रिया पार पडते. त्यात ध्रुव स्कूलच्या या विद्यार्थिनींनी भारतीय शास्त्रीय नृत्यातील 'ओडिसी' शैलीत उत्कृष्ट



सादरीकरण करत परीक्षकांची मने जिंकली. त्यांच्या लय, ताल आणि अभिव्यक्तीची दखल घेत त्यांची निवड करण्यात आली.

या यशामागे सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. नृत्य प्रशिक्षिका सोनाली महापात्रा व गंधर्व पलाई यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी तयारी केली.या पुरस्कारांचे वितरण २६ एप्रिल २०२६ रोजी नागपूर येथे होणार आहे. शाळेचे चेअरमन डॉ. संजय मालपाणी, व्हाईस चेअरमन गिरीश मालपाणी व प्राचार्या अर्चना घोरपडे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. या यशामुळे संगमनेर व अकोले परिसरात आनंदाचे वातावरण असून विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

द • ख • ल

### श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झालेल्या 'सिस पे' प्रकरणाचा धुरळा अजून खाली बसलेला नसतानाच, आता 'समर्थ क्रॉप केअर' या कंपनीच्या नावाखाली आणखी एक मोठा आर्थिक घोटाळा उघडकीस येत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जास्त परताव्याच्या आमिषाने गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रुपये उकळण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात मागील आठ दिवसांपासून काही गुंतवणुकदार गुन्हा दाखल करण्यासाठी येत असून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा गंभीर आरोप गुंतवणूकदारांनी केला आहे. आधी सिस पे मध्ये पैसे गेले, आता समर्थ क्रॉप केअरमध्ये आम्ही नेमकं कोणावर विश्वास ठेवायचा? असा संतप्त सवाल गुंतवणूकदार उपस्थित करत आहेत.दरम्यान, 'सिस पे' प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली असली, तरी काहीजण सध्या जामिनावर बाहेर आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.गुंतवणूकदारांचे म्हणणे आहे की, घोटाळ्याची रक्कम मोठी असल्यामुळे तपास वरिष्ठ पातळीवर जाईल, त्यामुळेच स्थानिक पातळीवर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली जात आहे. या आरोपांमुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# सिस्पे नंतर समर्थ क्रॉप केअरच्या आमिषाला बळी : लाखोंची फसवणूक

## ११ जणांविरुद्ध गुन्हा : जामखेड तालुक्यात खळबळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : सुरवातीला सिस पे मध्ये जास्त परताव्याचे आमिष दाखवत गुंतवणूक करून फसवणूक झाल्यावर पुन्हा 'समर्थ क्रॉप केअर' या कंपनीमार्फत एका तरुण शेतकऱ्याची तब्बल १२ लाख १० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिष्य पाठोपाठ आता समर्थक क्रॉप केअर चा घोटाळा उघड झाल्याने श्रीगोंदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, श्रीगोंदा येथील विकास प्रशांत जाधव (वय २६,) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, एप्रिल-मे २०२५ दरम्यान सोशल मीडियावर 'समर्थ क्रॉप केअर'ची माहिती पाहून ते कंपनीच्या सेमिनारला उपस्थित राहिले.

सेमिनारमध्ये गुंतवणुकीवर दरमहा १०% परतावा (५% नफा + ५% मूळ) असे आकर्षक आश्वासन देण्यात आले. पुण्यातील कार्यालयात भेटीदरम्यान कंपनीचे कामकाज, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि मोठ्या परताव्याची हमी यांचे सादरीकरण करून विश्वास संपादन करण्यात आला. यानंतर तक्रारदाराने १९ मे २०२५ रोजी २३ चेकद्वारे एकूण १८ लाख रुपये कंपनीच्या खात्यात जमा केल्याचे नमूद आहे. सुरुवातीला विश्वास बसावा म्हणून जून-ऑगस्ट २०२५ दरम्यान हप्त्यांमध्ये सुमारे ५.९० लाख रुपये परत करण्यात आले. मात्र पुढे परतावा अचानक बंद झाला. उर्वरित १२.१० लाख रुपये परत न करता टाळाटाळ करण्यात आली.

या प्रकरणात प्रशांत अनिल गवळी, ज्योती प्रशांत गवळी, अमृता प्रकाश सुपेकर, नवनाथ दगडू जाधव, सुदाम दास, प्रकाश मागणे, चंद्रकांत राकत, नागेश नामदेव जगताप, अविनाश सुर्वसे, मनीषा सुदाम दास आदींसह इतरांनी संगनमताने फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीसांनी ११ जणांविरुद्ध पुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू केला आहे. , गुंतवणूकदारांना आकर्षक परताव्याच्या आमिषापासून सावध राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

यामध्ये सिस पे कोट्यावधी रुपयाची फसवणूक झाल्याने अनेक जण रस्त्यावर आले असताना पुन्हा एकदा समर्थक क्रॉप केअर कंपनीमध्ये कोट्यावधीची गुंतवणूक झाली असल्याने हजारो जणांनी फसवणुकीचे बळी ठरले आहे. ज्यादा परताव्याच्या आमिषाने वारंवार होणाऱ्या फसवणुकीच्या घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

# सावेडीत हुक्का पार्लरवर छापा : दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सावेडी उपनगरातील सोनानगर चौक, बारस्कर मळा येथे अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर अहिल्यानगर शहर पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांच्या पथकाने छापा टाकला. याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून हुक्का पार्लर साठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी टाकलेल्या या छापा-सत्रामुळे सावेडी उपनगरात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, सावेडी उपनगरात एका पत्र्याच्या शेडमध्ये हा प्रकार सुरू होता. या कारवाईत पोलिसांनी हुक्का पिण्यासाठी वापरले जाणारे साहित्य आणि तंबाखूजन्य पदार्थ असा ४ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार हेमंत खंडागळे यांच्या फिर्यादीवरून आदिराज विलास दोमल (रा. बालिकाश्रम रस्ता, अहिल्यानगर), मोहम्मद सत्तार अन्सारी (रा. रांची, झारखंड, सध्या रा. दिल्लीगेट, अहिल्यानगर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावेडी उपनगरातील सोनानगर चौक, बारस्कर मळा येथे आदिराज दोमल हा अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याची माहिती डॉ. टिपरसे यांना मिळाली होती. त्यांनी अंमलदार खंडागळे, महेश मगर, सागर व्दारके यांच्या पथकाला कारवाईचे आदेश दिले. पोलीस पथकाने या ठिकाणी छापा टाकून कारवाई केली. आदिराज दोमल हा या हुक्का पार्लरचा मालक असून, तो बेकायदेशीरपणे हे केंद्र चालवत होता. छाप्यात मोहम्मद अन्सारी हा तरूण हुक्का पिताना रंगेहाथ मिळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून काचेचे पॉट, चिलीम, हुक्का पाईप, चिमटा आणि विविध कंपन्यांचे तंबाखूजन्य फ्लेवर्स असा मुद्देमाल जप्त केला आहे.

# गोसेवा केल्यास जीवन सार्थक होते : हभप झिंजुर्के महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : गाईची सेवा केल्याने आपले जीवन सार्थक होते.जीवनात चांगले सत्कर्म केल्यास फळ चांगले मिळते. असे प्रतिपादन हभप राम महाराज झिंजुर्के यांनी केले . मलकापूर ता शेवगाव येथे हभप निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व हभप संदीप महाराज खोसे उपस्थितीमध्ये सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त गुरुवर्य हभप राम महाराज झिंजुर्के यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. या प्रसंगी ह भ प राम महाराज झिंजुर्के यांनी उपस्थितांना गोसेवे चे मार्गदर्शन केले . यावेळी झिंजुर्के महाराज म्हणाले की, श्रीक्षेत्र पैठण दर महिन्याच्या एकादशीला स्वच्छता मोहीम राबविली जाते. गोदावरी नदी ही गंगा माता आपल्याला आयुष्यभर पोसते, त्यामुळे तिचे पावित्र्य आणि स्वच्छता राखणे ही आपली नैतिक जबाबदारी असुन नाथ महाराज मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी गावातील तरुणांनी पुढाकार घ्यावा.




प्रत्येक एकादशीला पैठण येथे जाऊन गंगा माता व नाथ महाराज परिसर स्वच्छ करण्याचे आवाहन करत, या माध्यमातून समाजाला एक सकारात्मक व नवी दिशा मिळेल, असा विश्वास महाराजांनी व्यक्त केला.या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता मंगळवार दि २८ एप्रिल रोजी हभप ऋषिकेश महाराज खोसे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

# सौ माया नवथर यांची 'नारी रत्न' पुरस्कारसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**ढोरजळगांव** (प्रतिनिधी): सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सौ. माया नितीन नवथर प्रिपीशाहली येथील रहिवासी व सध्या (रा. तिरुपती नगर, छत्रपती संभाजीनगर) यांची प्रतिष्ठित 'नारी रत्न पुरस्कार' साठी निवड करण्यात आली आहे. निवड समितीकडून त्यांना अधिकृत निवडपत्र प्रदान करण्यात आले आहे.

हा पुरस्कार संत रविदास बहुउद्देशीय चर्मकार जनहित सेवा समिती तसेच महाराष्ट्र ग्रामीण व शहरी श्रमिक इमारत बांधकाम कामगार संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जातो. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना गौरविण्याच्या उद्देशाने हा पुरस्कार प्रदान केला जातो.

सौ. माया नवथर यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून समाजातील वंचित घटकांसाठी काम केले आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत निवड समितीने त्यांची निवड केली आहे. निवडीबद्दल विविध स्तरातून सौ. माया नवघर यांचे अभिनंदन करण्यात येत आहे .

# कारखान्याच्या संचालकपदी निवडीबद्दल सरपंच जगताप यांचा सत्कार



**कडा** : आष्टी तालुक्याची कामधेनू समजल्या जाणाऱ्या कडा महेश सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांची निवड माजी. आ. भीमराव धोंडे याच्या नेतृत्वाखाली युवानेते डॉ. अजयदादा धोंडे यांच्या मार्गदर्शनात बिनविरोध पार पडली आहे. महेश सहकारी साखर कारखानाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

यावेळी पत्रकार दिगंबर बोडखे, प्रा.डॉ.बाळासाहेब धोंडे, पत्रकार नितीन काबळे, पत्रकार संजय खंडागळे, पै. सचिन शिंदे, आमोल साखरे, दत्तप्रसाद आडकर व इतर उपस्थित होते. आष्टी तालुक्याचे भाग्यविधाते माजी. आ. भीमराव धोंडे याच्या नेतृत्वाखाली युवानेते डॉ. अजयदादा धोंडे यांच्या मार्गदर्शनात माझ्यावर टाकलेला विश्वास सातत्याने कामातून सार्थ ठरवीन असे मत नवनिर्वाचित संचालक दादासाहेब जगताप यांनी व्यक्त केले. यावेळी नवनिर्वाचित संचालक पदी पाटण येथील युवा नेते कोहिनी पाटण ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच दादासाहेब जगताप यांची अविरोध निवड येथे सत्कार करण्यात आला.

# कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमधील वाद पुन्हा चव्हाट्यावर....

## उपगटनेते सतीश पाटील यांचे पद रद्द करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतीचे सर्व १५ नगरसेवकांचे गटनेता पद माझ्याकडेच असून आपण आजमितीस त्याच पदावर असून उप गटनेता पदावर असणाऱ्या व्यक्तीस कोणतीच सभा अथवा बैठक घेण्याचा नैतिक अधिकार नाही. त्यामुळे घटनेतील तरतुदीची पायमल्ली होत असल्याने कर्जतचे उप गटनेते सतीश पाटील यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी गटनेते संतोष मेहेत्रे यांनी नगरविकास विभागाचे सचिव यांना पत्र दिले आहे.

### मीच गटनेता. माझे अधिकार इतर कोणाला दिले नाही : संतोष मेहेत्रे

आजमितीस कर्जत नगरपंचायतीचे गटनेते पद माझ्याकडेच असून मी माझे कोणतेही अधिकार कोणाला दिले नाही. उप गटनेते यांना मी पदावर असताना आणि विशेष म्हणजे हयात असताना त्यांनी बैठक बोलविणे घटनेच्या अधिकाराच्या बाह्य असून त्यांचे उप गटनेते पद रद्द करण्याची मागणी आपण केली आहे.

या पत्राने पुन्हा एकदा कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांचा वाद चव्हाट्यावर आला आहे. मागील वर्षीच कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये धुसफूस वाढल्याने आमदार रोहित पवार यांच्या गटातील तब्बल ११ नगरसेवकांनी बंड पुकारले होते. यात कर्जत नगरपंचायतीचे गटनेते, उप गटनेते यांच्यासह नगरसेवक-नगरसेविकांचा समावेश होता. तदनंतर यासर्व बंडखोर नगरसेवकांनी भाजपाच्या राम शिंदे बरोबर मेळ घालीत सत्तांतर घडवत भाजपात प्रवेश केला. यावेळी राम शिंदे यांनी उर्वरीत काळासाठी दोन नगराध्यक्षा आणि उपनगराध्यक्ष पदाचे नावे जाहीर केली होती. मात्र ठरलेल्या सूत्रानुसार बदल न झालेल्या पुन्हा एकदा कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांत सुप्त असंतोष उफाळला आहे.

नुकतेच उप गटनेते सतीश पाटील यांनी शुक्रवार, दि २४ रोजी कर्जतच्या सर्व नगरसेवक-नगरसेवकांना सर्वसाधारण सभा आणि बैठकीचे पत्र पाठवल्याने गटनेते तथा विद्यमान उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांनी सतीश पाटील यांना कायदेशीर बाबीची जाणीव करून देत चक्क नगरविकास विभागाचे महाराष्ट्र सचिव यांना त्यांचे उप गटनेते पद रद्द करण्याची मागणी केली आहे. मेहेत्रे यांनी सदरच्या पत्रात गटनेता पदाच्या जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी दिलेल्या तरतुदीनुसार गटनेता असताना उप गटनेत्यास बैठक बोलविण्याचा कोणताच नैतिक अधिकार नाही. त्यांच्या या पत्राने पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गटनेता निवडीच्या घटनेच्या अधिकार कलम ६ च्या तरतुदीनुसार उप गटनेते सतीश पाटील नियमानुसार काम करीत नसल्याचे सिद्ध होत असून त्यांची नियुक्ती आणि उप गटनेते पद रद्द करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. संतोष मेहेत्रे यांच्या या पत्राने पुन्हा एकदा कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून आगामी काळात धुसफूस वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यात राम शिंदे कसा मार्ग काढतील हे पाहणे आता महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# आष्टी ग्रा.रु.मध्ये डायलॅसिस सेंटर आणि सोनोग्राफी मशीनचे आ.सुरेश धस यांच्या हस्ते होणार लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आष्टी** : ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात नूतन डायलॅसिस सेंटर आणि सोनोग्राफी मशीनचा शुभारंभ करण्यात येणार आहे.५.०० लक्ष लिटर क्षमतेच्या पाणीसाठा तलावाचेही लोकार्पण शनिवार, २५ एप्रिल रोजी आ.सुरेश धस यांच्या हस्ते होणार आहे. आष्टी येथे ग्रामीण रुग्णालयात सोनोग्राफी आणि डायलिसिस सुविधा उपलब्ध करून देण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे.या मागणीला यश येत आरोग्य विभागाने ग्रामीण रुग्णालयात या दोन्ही मशीन उपलब्ध करून दिले आहेत.शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीश सोळंके उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास मोराळे, महाडायलॅसिस विकास कदम रुग्ण कल्याण समितीचे सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे आणि संनियंत्रण समितीचे सदस्य जालिंदर पोकळे यांनी केले आहे.किडनी विकाराने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी 'महाडायलॅसिस' प्रकल्पांतर्गत हे सेंटर जीवनवाहिनी ठरणार आहे.डायलिसिस साठी सध्या नगरला जावे लागते मात्र आष्टी ग्रामीण रुग्णालयात हे सुविधा उपलब्ध झाल्याने अ.नगर जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

सध्या सोनोग्राफी मशीनचा फक्त गरोदर मातांना उपयोग होतो.नियमित रेडिओलॉजिस्ट उपलब्ध झाल्यास सर्व रुग्णांना याचा फायदा होऊ शकेल. सध्या बाहेर यासाठी किमान एक हजार रुपये फी मोजावी लागते. त्यामुळे या रुग्णालयात नियमित रेडिओलॉजिस्ट उपलब्ध करून द्यावा अशी नागरिकांची मागणी आहे.

# शेख मुदस्सीर यांची सकल मुस्लिम युवक संघाच्या प्रदेश संघटक पदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**परळी** : परळी येथील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असलेले शेख मुदस्सीर नसीर यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या प्रदेश संघटक पदी निवड करण्यात आली आहे. ही निवड दिनांक २३ एप्रिल रोजी करण्यात असून आहे.शेख मुदस्सीर हे मागील अनेक वर्षांपासून समाजकारण आणि पत्रकारिता क्षेत्रात काम करत आहेत.

सामाजिक प्रश्नांची चांगली जाण, लोकांशी संवाद साधण्याची क्षमता आणि युवकांना एकत्र कौशल्य यामुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध सामाजिक मुद्द्यांवर त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून, गरजूंना मदत करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि समाजात जागरूकता निर्माण करणे यामध्ये त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे.त्यांच्या या सातत्यपूर्ण कामाची तसेच सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेसोबत सुरुवातीपासून असलेल्या सहभागाची दखल घेत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांनी त्यांची प्रदेश संघटक म्हणून निवड केली आहे.

या पदाच्या माध्यमातून राज्यभरातील युवकांना संघटित करून सामाजिक आणि संवैधानिक न्याय हक्कांसाठी लढा अधिक बळकट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

# जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी घेतला कर्जत तालुक्याचा आढावा....

## मिरजगाव, निमगाव डाकू , टाकळी खंडेश्वरी गावास दिली भेट



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : सध्या उन्हाची तीव्रता अधिक असून सर्वसामान्य नागरिक यासह पशुधनाची योग्य काळजी घेण्यास तालुका प्रशासनाने सतर्क राहावे. यासह हवामान विभागाने अवकाळी पावसाची शक्यता देखील वर्तवली असून या काळात आपत्ती व्यवस्थापन दक्ष ठेवावे. पाणीटंचाई, चाराटंचाई यासाठी उपाययोजना तात्काळ अमलात आणाव्यात.

### मागणी तेथे पुरवठा सूत्र अवलंब करा - पंकज आशिया

उन्हाळ्याचे सव्वा महिना अद्याप बाकी असून या काळात प्रशासनाने अधिक दक्ष राहावे. हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिला आहे. यात आपत्ती व्यवस्थापन सतर्क ठेवा. यासह मोजक्या गावात पाणीटंचाई उदभवण्याची दाट शक्यता आहे. त्याचा आढावा घेत टँकर प्रस्ताव दाखल झाल्यास त्याची योग्य खातरजमा करून तात्काळ उपाय योजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिया यांनी बैठकीत दिल्या.

नैसर्गिक पाण्याचे जलस्रोत त्याची पाण्याची पातळी तसेच पाण्याचा अवैध उपसा यासाठी सर्व प्रशासकीय विभागाने संयुक्त काम करीत नागरिकांना दिलासा देण्याचे कार्य पार पाडावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी केले. कर्ज येथे तालुका प्रशासकीय विभागाच्या आढावा बैठक प्रसंगी ते बोलत होते.

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी शुक्रवार,( दि २४) रोजी कर्जत तालुक्यातील विविध ठिकाणी भेट देत शासकीय कार्याचा आढावा घेतला. यात मिरजगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची पाहणी, उष्माघात सेंटरला भेट देत आरोग्य विभागाकडून माहिती घेतली. निमगाव डाकू येथील मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पास भेट देत कामाच्या प्रगतीबाबत संबंधित विभागाकडून त्याचा आढावा घेतला. टाकळी खंडेश्वरी येथील बांबू शेतीस भेट देत कृषी विभागाच्या योजनाबाबत माहिती घेतली, रातजन येथील लोक सहभागातून तयार केलेल्या शीव रस्त्याच्या कामाची पाहणी करीत शेतकऱ्यांशी संवाद साधला.

शेवटी कर्जत तहसील कार्यालयाच्या सभागृहात कर्जत तालुका प्रशासनातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेत कर्जतच्या टंचाई आढावा बैठक घेतली. यात प्रामुख्याने पाणीटंचाई, पशुधन चारा परिस्थिती, नैसर्गिक पाण्याचे जलस्रोत त्याची पाणी पातळी, कृषी विषयक खते, बी-बियाणे, आरोग्य विभागाच्या आढावा उपस्थित अधिकाऱ्यांकडून घेत त्यात काही सुधारणा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिया यांनी केल्या. या दौऱ्याप्रसंगी प्रांताधिकारी नितीन पाटील, पोलीस उपअधीक्षक प्रवीण लोखंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता प्रशांत वाकचौरे, पोलीस निरीक्षक सोपान शिरसाट, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ महारुद्र खरपाडे यांच्यासह विभाग प्रमुख उपस्थित होते.

द • ख • ल

## पारंपरिक वाद्य कलावंत व प्रसिद्ध गायक सावकार गायकवाडाचे निधन



**वळती (ता. आंबेगाव) :** येथील पारंपरिक वाद्य कलावंत व प्रसिद्ध गायक सावकार लक्ष्मण गायकवाड (वय ६१) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे वळती परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संगीत क्षेत्रातील एक अनुभवी आवाज हरपला आहे. सावकार गायकवाड हे पारंपरिक लोकवाद्य व गायन कलेत प्रवीण होते. त्यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून ग्रामीण भागात सांस्कृतिक परंपरा जपण्याचे मोलाचे कार्य केले होते. त्यांच्या सादरीकरणामुळे अनेक कार्यक्रमांना विशेष रंगत यायची. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांसह मोठा मित्रपरिवार आहे. ते भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यातील कर्मचारी वैभव गायकवाड यांचे वडील तसेच भागवताचार्य बाळासाहेब महाराज गायकवाड यांचे बंधू होत. त्यांच्या निधनाने गावातील सांस्कृतिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

## चिकणे पितापुत्रांची गगनभरारी 'विठूमाऊली' गुळाचा पुरंदरमध्ये डंका

**पुरंदर :** आयटी युगात महागड्या शिक्षणाचा आणि नोकरीचा मोह टाळत पारंपरिक शेतीकडे वळण्याचं धाडस फारच कमी जण करतात. मात्र जयाद्री खोऱ्यातील निलेश चिकणे आणि त्यांचे सुपुत्र ओंकार चिकणे या शेतकरी पितापुत्रांनी नैसर्गिक शेती आणि गुळ उत्पादनाच्या माध्यमातून एक आदर्श निर्माण केला आहे.चिकणे कुटुंबीयांनी शंभर टक्के नैसर्गिक पद्धतीने, कोणतेही केमिकल किंवा कृत्रिम पदार्थ न वापरता पारंपरिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुळ



उत्पादन सुरू केले आहे. त्यांच्या 'विठूमाऊली' या नावाने तयार होणाऱ्या गुळाला आणि त्यापासून बनवलेल्या विविध पदार्थांना तालुक्यात उत्तम प्रतिसाद मिळत असून, त्यांच्या उत्पादनाचा डंका सध्या सर्वत्र गाजत आहे. संपूर्ण कुटुंब सकाळपासून सायंकाळपर्यंत गुळ उत्पादन केंद्रात कार्यरत असते. पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या गुळापासून काकवी, गुळाच्या ढेपी यांसारखी उत्पादने तयार केली जातात. उत्कृष्ट चव आणि शुद्धतेमुळे नागरिकांकडून या उत्पादनांचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. 'विठूमाऊली' या नावाखाली तयार होणारे सर्व पदार्थ सात्विक आणि आरोग्यदायी असल्याचा दावा निलेश चिकणे यांनी केला. चहा किंवा इतर खाद्यपदार्थांमध्ये वापरला तरी हा गुळ पूर्णपणे सुरक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महागड्या शिक्षणाला आणि नोकरीला नकार देत ओंकार चिकणे यांनीही वडिलांचा व्यवसाय पुढे नेण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काळात ड्रायफ्रूट्सचा वापर करून चिक्की, बर्फी आणि बिस्किटे तयार करण्याचा त्यांचा मानस आहे.

## जातेगाव खुर्द येथे ३३/२२ केव्ही विद्युत उपकेंद्रास मंजुरी



**कवठे येमाई :** – शिरूर तालुक्यातील जातेगाव खुर्द परिसरासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत नवीन ३३/२२ केव्ही विद्युत उपकेंद्रास अखेर मंजुरी मिळाली आहे. या उपकेंद्रासाठी ११ कोटी ११ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, स्थानिक नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असल्याची माहिती राज्याचे माजी सहकार मंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी दिली. या उपकेंद्रासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या प्रयत्नांना यश आल्याची भावना व्यक्त होत आहे. या प्रकल्पामुळे जातेगाव खुर्दसह परिसरातील वीज वितरण व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार आहे.नवीन उपकेंद्रांतर्गत ३३ केव्ही व २२ केव्हीच्या स्वतंत्र उच्चदाब (एचटी) लाईन्सचे जाळे उभारण्यात येणार असून, त्यामुळे वीजपुरवठा अधिक सक्षम आणि स्थिर होईल. तसेच हे उपकेंद्र आधुनिक 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टम'ने सुसज्ज असणार असल्याने तांत्रिक बिघाड तात्काळ शोधून त्यावर कार्यवाही करणे सुलभ होणार आहे.सध्या परिसरात कमी दाबाने वीज मिळणे, वारंवार खंडित होणारा पुरवठा अशा समस्या नागरिकांना भेडसावत होत्या. या उपकेंद्रामुळे त्या समस्या कायमस्वरूपी मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.जातेगाव व परिसरातील नागरिकांना दर्जेदार आणि अखंडित वीजपुरवठा मिळावा, हा आमचा प्रयत्न आहे. या उपकेंद्रामुळे त्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे, असे मत माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी व्यक्त केले.

# ओतूरमध्ये वाढत्या गुन्हेगारीला लगाम पोलिसांचा कडक इशारा

## HD सीसीटीव्ही बसवा, डेटा दीर्घकाळ जतन करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळेफाटा :** ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत (ता. जुन्नर) वाढत्या चोरीच्या घटना व इतर गुन्हेगारी प्रकारांच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीण पोलिसांनी आता कडक भूमिका घेतली आहे. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या संकल्पनेतून पुणे ग्रामीण हद्दीत १०हजार सी सी टीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्धार केला असल्याच्या पार्श्वभूमीवर ओतूर पोलिसांनी सर्व पोलीस पाटील, ग्रामपंचायत प्रशासन आणि नागरिकांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या असून, सीसीटीव्ही यंत्रणेबाबत कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचा इशारा दिला आहे. ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी यासंदर्भात पत्राद्वारे निर्देश जारी केले आहेत.

पोलीस तपासात वारंवार असे आढळून आले आहे की, अनेक दुकाने, घरे, हॉटेल्स, बँक , ज्वेलर्स व पतसंस्थांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले असले तरी त्यांचा वापर अत्यंत अपुरा आणि निष्काळजी पद्धतीने होत आहे. बहुतांश कॅमेरे केवळ आतील भागावर केंद्रित असल्याने बाहेरील भागातील रस्त्यावरील हालचालींची वाहतूक नोंद होत नाही. याशिवाय, ते अनेक ठिकाणी डेटा फक्त २ ते ३ करू दिवसांपुरताच साठवला जात असून, कॅमेरे व ृतठ यंत्रणा कार्यरत आहे की नाही याची कोणतीही कल्पना नाही पोलिस प्रशासनाच्या वतीने नियमित वाहन तपासणी केली जात नाही.

या गंभीर त्रुटींमुळे गुन्हे घडल्यानंतर तपासात मोठे अडथळे निर्माण होत असून, गुन्हेगारांना शोधण्यात विलंब होत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**कडक सूचना व अंमलबजावणी:**

प्रत्येक घर, दुकान व आस्थापनाबाहेर सार्वजनिक रस्ता स्पष्टपणे कॅमेऱ्यात येईल, अशी व्यवस्था करणे बंधनकारक. उच्च दर्जाचे (कृ) सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक. किमान अधिक दिवसांचा डेटा साठवणूक कालावधी सुनिश्चित करणे. कॅमेरे व ृतठ यंत्रणेची नियमित तपासणी करून ती सतत कार्यरत ठेवणे अनिवार्य. या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे. गुन्हे रोखण्यासाठी केवळ पोलीस यंत्रणा पुरेशी नाही, तर नागरिकांचे सक्रिय सहकार्य अत्यावश्यक आहे. सीसीटीव्ही ही केवळ औपचारिकता





नसून ती गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रभावी साधन आहे, असे स्पष्ट शब्दांत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी नमूद केले आहे. ओतूर पोलिसांच्या या कडक भूमिकेमुळे परिसरात शिस्त आणि सजगता वाढून गुन्हेगारीवर प्रभावी आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जेजुरी टोलनाक्यावर 'मनसे'चा सर्जिकल स्ट्राईक

## प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणाविरुद्ध आक्रमक पवित्रा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी**-पुणे मार्गावरील नव्याने सुरू करण्यात आलेल्या टोलनाक्यावर आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने (मनसे) तीव्र आंदोलन करण्यात आले. स्थानिक नागरिकांना टोलमध्ये सवलत मिळावी आणि रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच सुरू केलेली टोल वसुली तातडीने थांबवावी, या मागणीसाठी मनसे कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेत टोलनाका बंद पाडला. यावेळी मनसे कार्यकर्त्यांनी टोल प्रशासनाविरुद्ध जोरदार घोषणाबाजी करत सर्व वाहने विनाटोल सोडून दिली. जेजुरी परिसरात नव्याने टोलनाका सुरू करण्यात आला आहे. मात्र, रस्ता पूर्णतः सुस्थितीत नसताना आणि स्थानिकांशी चर्चा न करताच ही वसुली सुरू करण्यात आल्याचा आरोप मनसेच्या वतीने करण्यात येत आहे. व्हिडिओमध्ये दिसल्याप्रमाणे, मनसेचे स्थानिक नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने टोलनाक्यावर दाखल झाले. त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना आणि उपस्थित पोलीस प्रशासनाला जाब विचारला. ''जोपर्यंत स्थानिकांच्या मागण्या मान्य होत नाहीत आणि लेखी आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत एकही रुपया टोल देऊ नका,'' असे आवाहन कार्यकर्त्यांनी प्रवाशांना केले.

आंदोलनादरम्यान मनसे नेत्यांनी सांगितले की, गेल्या १५ दिवसांपासून या टोल संदर्भात प्रशासनासोबत पुणे आणि इतर ठिकाणी बैठका झाल्या होत्या. मात्र, प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने अखेर पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशानुसार रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेण्यात आला. कार्यकर्त्यांनी स्वहस्ते टोलचे बॅरिकेड्स बाजूला सारले आणि वाहनांची कोंडी फोडून त्यांना विनाटोल जाण्यासाठी



वाट मोकळी करून दिली. या आंदोलनामुळे जेजुरी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. पोलिसांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला, मात्र आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते. मनसेच्या या 'स्टाईल' आंदोलनामुळे प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला असला तरी, टोल वसुली पुन्हा सुरू करण्यावरून प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ''जर स्थानिकांवर अन्याय झाला, तर हे आंदोलन यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे असेल,'' असा सज्जड इशाराही यावेळी देण्यात आला.

''आम्ही गेल्या १५ दिवसांपासून शांततेने चर्चा करत आहोत. पुणे आणि इतर स्तरावर बैठका झाल्या, पण प्रशासनाला सामान्य जनतेच्या त्रासाशी काहीही देणेघेणे नाही. जोपर्यंत लेखी निर्णय येत नाही, तोपर्यंत जेजुरीचा हा टोल सुरू होऊ देणार नाही. ही मनसेची स्पष्ट भूमिका आहे.''- मनसे स्थानिक पदाधिकारी

## शिरूरमध्ये साखर कारखान्याची २४ लाखांची फसवणूक; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** - शिरूर तालुक्यातील रावडेवाडी येथील साखर कारखान्याची तब्बल २४ लाख ३८ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राहुल रामदास भाकरे (वय ३६, रा. माळवाडी, टाकळी हाजी, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीवरून गोरख भारमल राठोड, नितीन तुळशीराम चव्हाण आणि ज्ञानेश्वर गबरू राठोड (सर्व रा. घोडेगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दि. १४ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास रावडेवाडी येथील पराग ॲग्रो फूड्स ॲण्ड अलाईड प्रॉडक्ट्स प्रा. लि. या साखर कारखान्यात संबंधित आरोपींनी ऊसतोड मजूर पुरवठा करण्याचे खोटे आश्वासन दिले. यासाठी त्यांनी लेखी करार करून विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी संगनमताने अनुक्रमे ८,१८,००० रुपये, ४,८६,००० रुपये आणि ११,३४,००० रुपये असे एकूण २४,३८,००० रुपये त्यांच्या बँक खात्यावर घेतले. मात्र प्रत्यक्षात कोणताही मजूर पुरवठा न करता कारखान्याची आर्थिक फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी दि. २३ एप्रिल २०२६ रोजी सायं. ४:३४ वाजता गुन्हा क्रमांक ३५२/२०२६ नुसार भा.न्या.सं. कलम ३१६(२), ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पवार करत असून, गुन्हा दाखल करण्याचे काम पोलीस हवालदार जाधव यांनी केले आहे.शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## सासवडच्या रस्त्यांवरील अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाई करा

### स्व एकनाथ जगताप प्रतिष्ठानची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** सासवड शहराला सध्या अनधिकृत फळ व भाजी विक्रेते, बेशिस्त वाहनचालक आणि राजकीय फ्लेक्सबाजीमुळे विद्रुपीकरणाचा विळखा पडला आहे. या प्रश्नावर पालिका प्रशासनाने कडक कारवाई करावी अशी मागणी स्व. एकनाथ जगताप प्रतिष्ठानच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे याच समस्येचा एक भाग असणाऱ्या सासवड पोलिसांना देखील कारवाई संदर्भात एक निवेदन देण्यात आले आहे. नगरपालिका प्रशासन आणि पोलीस खाते याविषयी अधिक सतर्क झाले असून, येत्या सोमवारपासून शहरात व्यापक मोहीम राबवण्यात येणार आहे असे सांगण्यात आले. सदरच्या निवेदनात नगरपालिकेच्या इमारतीसमोरच अनधिकृत विक्रेत्यांचे साम्राज्य पसरले असून, यामुळे इमारतीने जणू मोकळा श्वास गमावला आहे. सोमवारी आठवडे बाजारासह आठवड्याचे सातही दिवस अतिक्रमणे होत आहेत. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता प्रशासनाने ही अतिक्रमणे हटवावीत, अन्यथा लोकसंघर्ष छेडला जाईल, असा इशारा. दिला आहे. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप व सचिव हेमंत ताकवले उपस्थित होते. दर सोमवारी पालिकेसमोर महामार्गावर दोन्ही बाजूंनी फळविक्रेत्यांच्या हातगाड्या उभ्या राहतात. व त्यापुढे ग्राहकांची दुचाकी व चारचाकी वाहने उभी राहिल्याने रस्त्यावरील वाहतूकीला अडथळे येतात. एखादा अपघात झाल्यावर कारवाई होणार का? असा प्रश्न संतोष जगताप यांनी उपस्थित केला आहे.

नगरपालिकेसमोरील तसेच शहरात वाहतूककोंडी होणाऱ्या ठिकाणच्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यासाठी विशेष पथके नेमली आहेत.



पथकांकडून कारवाई सुरू आहे. पोलीस प्रशासनाशी चर्चा करून सात होमगार्डची मागणी केली असून एका महिन्याचे मानधनही दिले आहे. मात्र, अपेक्षित सहकार्य मिळत नाही. येत्या सोमवारी मी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांवर जप्तीची आणि दंडात्मक कारवाई करणार आहे असे सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण यांनी स्पष्ट केलं आहे तर वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे २५ होमगार्डची मागणी केली आहे. येत्या सोमवारी मार्गावर कोठेही वाहतूककोंडी होणार नाही, याची खबरदारी घेतली जाईल. मार्गावर एकही हातगाडी दिसणार नाही यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांना कडक सूचना दिल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवली जाईल.''असे पोलिस निरीक्षक कुमार कदम यांनी म्हटले आहे

## ११ कोटी ९८ लाखांच्या विकास कामांचे लोकार्पण

### भोरला संग्राम थोपटेंचा पुढाकार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भोर :** भोर शहरातील एस.टी.बस स्टॅन्ड समोरील उभारण्यात आलेले भव्य श्री.छत्रपती संभाजीराजे व्यापारी संकुल (८ कोटी ८३ लाख )आणि रामबाग येथे बांधण्यात आलेला राजमाता जिजाऊ जलतरण तलाव बांधणे (३ कोटी १५ लाख) अश्या एकूण ११ कोटी ९८ लाखांच्या निधीतून भोर नगरपरिषदेच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांचे उदघाटन आज( दि.२१) माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शेखर वढणे आदी मान्यवर उपस्थित होते.

भोर शहराच्या निसर्गरम्य सौंदर्यात व वैभवात भर घालणाऱ्या आणि नगरपरिषदेच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी व्यापारी संकुल महत्वपूर्ण ठरणार आहे.व्यापारी इमारतीचा भव्य लोकार्पण सोहळा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांच्या उपस्थितीत पार पडला.

यावेळी पुणे जिल्हा परिषद सदस्य स्वरूपा थोपटे, सदस्य पोपटराव सुके, भोर पंचायत समितीचे



माजजी उपसभापती मानसिंग धुमाळ, भोर तालूका भाजपा अध्यक्ष संतोष धावले,रविंद्र कंक, राजगड तालूका अध्यक्ष राजू रेणुसे, भोर पंचायत समितीचे सदस्य रोहन बाठे, माऊली पांगारे,सुषमा चव्हाण, गिता आंबवले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुरेश राजीवडे, उपसभापती प्रवीण शिंदे, राजगड सहकारी साखर कारखाना संचालक सुभाष कोंढाळकर, सुधीर खोपडे, भोर नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड.जयश्री शिंदे, गटनेते अमित सागळे ,जगदीश किरवे ,गणेश पवार , माजी नगराध्यक्ष चंद्रकांत सागळे, सचिन हर्णसकर , संजय जगताप,बंडूशेठ गुजराथी,सचिन मांडके, प्रमोद कुलकर्णी, नारायण जाधव , शहरातील व्यापारी वर्ग, शहर भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मान्सूनपूर्व आढावा बैठक संपन्न

## एल-निनोचा प्रभावामुळे पाणी पुरवठाबाबत नियोजन कर : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे, ही बाब लक्षात घेता जलसंपदा विभागाने पाणी पुरवठ्याबाबत नियोजन करावे. मान्सूनपुर्व करावयाचे कामांचे सुक्ष्म नियोजन करुन ती सर्व कामे पावसाळ्यापूर्वी वेळेत पूर्ण करावीत, कामे करतांना सर्व सबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा.असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी दिले. याबैठकीत जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकरी विठ्ठल बनोटे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, कृषी, आरोग्य, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका, नगर परिषद, पुणे प पिंपरी चिंचवड शहर पोलीस आयुक्तालय, जिल्हा पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महावितरण, प्रादेशिक परिवहन कार्यालय, जलसंपदा, एनडीआरएफ भारतीय हवामान विभागासह सर्व संबंधित विभागांचे



उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार, मुख्याधिकारी उपस्थित होते. श्री. डुडी म्हणाले, यावर्षी १५ ऑगस्टपर्यंत पाणी पुरेल यादृष्टीने जलसंपदा विभागाने नियाजन केले आहे.परंतु एल-निनोचा प्रभाव लक्षात घेता सन २०२७ मध्ये फेब्रुवारी ते मे या कालावधीत पाणी पुरेल यादृष्टीने कार्यवाही करावी, गतवर्षी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याबाबत जलसंपदा विभागाने उत्तम नियोजन केले होते, त्याचदृष्टीने यावर्षीही समन्वयाने कार्यवाही करावी. नदी, कालवा, नाला परिसरात अतिक्रमणे, राडारोडा काढण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी. पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत सुरळीत राहतील , यादृष्टीने कार्यवाही करावी. धरणाच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने आढावा, धरण बांधकाम, कालव्याची तपासणी करावी. गतवर्षी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा कार्यपालन अहवाल माहे एप्रिल अखेरचा जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावा. सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पुल, रस्ते, पूरबाधित गावांची पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. गतवर्षी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा कार्यपालन अहवाल माहे एप्रिलअखेर सादर करावा. पावसाळ्यात बंद रस्त्याला असलेले पर्यायी रस्त्याबाबत माहिती नागरिकांना द्यावी. आणीबाणीच्या वेळी उपयोगात येणारी बुलडोझर्स, वॉटरटँकर्स, डंपर्स, अर्थमुव्हर्स, डिवॉटरींग पंप्स, जनरेटर्स, ट्री कटर्स, फल्ड लाईट, आर.सी.सी.कटर्स, इत्यादी साहित्याची चालू स्थितीमध्ये असल्याबाबत याची खात्री करुन घ्यावी.पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषद नगरपंचायतीने आपल्या हद्दीतील धोकादायक इमारतीची बांधकाम तपासणी करावी. धोकादायक इमारतीमधील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थालंतर करावे. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी आपल्या हद्दीतील अनाधिकृत जाहिरात फलके महिन्याभरात काढून घ्यावीत. पावसाळ्यात पर्यटनस्थळे बंद केली जाणार नाहीत, त्यामुळे पर्यटनस्थळी एकाच वेळी किती पर्यटकांना सोडता येईल, सुरक्षितेतच्यादृष्टीने पोलीस, वन, पर्यटन, पुरात्व विभागाने पर्यटकांचे स्लॉट तयार करावेत. पर्यटनस्थळी आवश्यक ते प्रमाणे मनुष्यबळ नियुक्त करावे. आरोग्य विभागाने संभाव्य आपत्कालिन परिस्थितीचा विचार करुन नागरिकांना तात्काळ सेवा मिळेल, याबाबत नियोजन करावे. तालुकानिहाय रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे साठा तयार ठेवावे. साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. संबंधित विभागाने जिल्हास्तरापासून ते गावपातळीपर्यत आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करुन घ्यावा. याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. आजच्या बैठकीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी तालुकानिहाय आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेवून संबंधिताना सूचना द्याव्यात. मान्सून काळात पूरबाधित गावाच्या अनुषंगाने आपत्कालीन यंत्रणा सर्व विभागांच्या समन्वयाने सज्ज ठेवावी. नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता आपत्तीच्या काळात आवश्यक त्या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात यावे. भोर, खेड, आंबेगाव उपविभागात भुस्खलनाच्या पार्श्वभुमीवर नागरिकांचे स्थलांतर, आपदा मित्राचे प्रशिक्षण, सुसज्ज साहित्य तसेच मॉकड्रीलचे आयोजनाबाबत कार्यवाही करावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने त्यांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील यादृष्टीने नियोजन करावे. यावेळी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने करीत असलेल्या तयारीबाबत माहिती दिली.

## पुरंदर तालुक्यात ''इंद्रनील '' पुरंदर जैवविविधता केंद्राचे उद्घाटन ग्रामगौरव प्रतिष्ठानचा उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** पुरंदर तालुक्यातील जैवविविधता चे संवर्धन व जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा एक भाग म्हणून तालुक्यातील गोटे माळ येथील ग्रामगौरव प्रतिष्ठानच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्रात ''इंद्रनील'' जैवविविधता केंद्राचे उद्घाटन आधारकर रिसर्च इन्स्टिटयूटचे डॉ विनया घाटे यांच्या हस्ते करण्यात आले. पुरंदरच्या गटविकास अधिकारी प्रणोती श्री श्रीमाळ ऑप्टिमा लाईफ सायन्सचे चेअरमन विनय कुलकर्णी, वाघीरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पंडित शेळके आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. ताम्हण वृक्षाचे वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रतिष्ठानच्या कार्यकारी विश्वस्त डॉ सोनाली शिंदे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्तविक केले. स्थानिक जैव विविधतेचे प्रदर्शन, शाश्वत विकास उपक्रम व त्याची माहिती, पर्यावरण संवर्धन विषयक मार्गदर्शन, पक्षी, प्राणी, वन्य जीव यांचे पोस्टर, माहिती फलक, देशी बियाणे बँक व त्याची माहिती अशा स्वरूपातील हे इंद्रनील केंद्राचे काम असल्याचे सांगण्यात आले. योगेश मगर यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली. प्रमुख भाषणांत डॉ विनया घाटे यांनी पर्यावरण संवर्धन करताना विवेक महत्वाचा असल्याचे प्रतिपादन केले. एचसीएल फाऊंडेशन व ऑप्टिमा लाईफ सायन्सचे या उपक्रमास आर्थिक पाठबळ आहे. कार्यक्रमास समूचितइन्व्हायरो टेक च्या डॉ प्रियदर्शिनी कर्वे, ऊर्जाबॉक्स च्या विशाखा चांधेरे,देवराई फाऊंडेशनचे रघुनाथ ढोले यांसह अनेक पर्यावरणप्रेमी हजर होते. प्रशांत बोरावके यांनी सूत्र संचालन केले तर प्रसाद सेवेकरी यांनी आभार मानले.



# खांबाळी पाझर तलाव लुटला जातोय; १ मे रोजी 'रेड गॅझेट' प्रसिद्ध होणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर,** पारनेर तालुक्यातील पळशी येथील खांबाळी पाझर तलाव (लघु सिंचन प्रकल्प) परिसरात सुरू असलेल्या कथित पाणी व वीज चोरीच्या प्रकारामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणात तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा 'पीपल्स हेल्पलाईन' संघटनेने दिला आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र दिनी, १ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हुतात्मा स्मारक येथे खांबाळी पाझर तलाव रेड गॅझेट प्रकाशित करण्यात येणार आहे.

संघटनेचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, तलावातील पाण्याचा मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उपसा केला जात असून वीज चोरी करून मोटारी चालवल्या जात आहेत. परिणामी, तलावातील जलसाठा झपाट्याने कमी होत असून त्याचा थेट परिणाम लाभार्थी शेतकरी आणि ग्रामस्थांवर होत आहे.

खांबाळी पाझर तलाव हा परिसराच्या जलव्यवस्थेचा कणा मानला जातो. झिरपण प्रक्रियेद्वारे भूजल पातळी वाढवणे आणि सूक्ष्म जलउठावामुळे पाणी टिकवून ठेवणे ही या तलावाची वैशिष्ट्ये आहेत. यामुळे खालच्या भागातील विहिरींना सातत्याने पाणीपुरवठा होऊन शेकडो एकर शेतीला आधार मिळतो. मात्र, सध्या सुरू असलेल्या अवैध उपशामुळे ही नैसर्गिक जलसाखळी धोक्यात आली आहे.

तज्ज्ञांच्या मते, अनियंत्रित पाणी वापरामुळे संपूर्ण जलचक्र कोलमडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

परवानगीशिवाय पाणी वापर, वीज चोरी आणि नियमबाह्य सिंचनामुळे वैध लाभार्थी शेतकरी पाण्याअभावी त्रस्त झाले आहेत. विहिरींची पातळी घटत असून, ड्रिप सिंचनासाठी आवश्यक पाणीही कमी झाले आहे. याचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. ही सार्वजनिक जलसंपत्तीची लूट असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसत आहे, असा आरोप करण्यात आला आहे.


प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत अवैध मोटारी सुरू कशा? वीज जोडण्या का तोडल्या जात नाहीत? असे सवाल उपस्थित करण्यात आले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

दरम्यान, १ मे रोजी प्रसिद्ध होणाऱ्या 'रेड गॅझेट'मध्ये या प्रकरणाचे पुरावे, संबंधितांची माहिती आणि नागरिकांवरील अन्यायाचे दस्तऐवजीकरण मांडले जाणार आहे. पुढील टप्प्यात उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून न्यायालयीन लढा उभारण्याची तयारी संघटनेने दर्शविली असून, गरज पडल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचाही इशारा देण्यात आला आहे.



## द•ख•ल

### कुसडगाव येथे श्री काळोबा देवाच्या यात्रेचे आयोजन




**जामखेड :** जामखेड तालुक्यातील सुप्रसिद्ध आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुसडगावच्या श्री काळोबा देवाची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होत आहे.यात्रेच्या निमित्ताने शनिवार, २५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ ते रात्री १२:३० या वेळेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच राहुल उद्योग समूहाच्या वतीने रात्री ८ ते ११ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेची मुख्य आकर्षणे:नायगाव येथील दत्ताजी शिंदे मर्दानी आखाड्याच्या वतीने मुलींचे चित्तथरारक 'रणमर्द' कार्यक्रम. असुन जिल्हा प्राथमिक शाळा कुसडगावमच्या इयत्ता १ ली ते ७ वीच्या मुला-मुलींचे लेझीम पथक.जामखेड येथील तुळजा भवानी हलगी पथक व ढोल बाजा पथक. जवळका येथील आराधी कार्यक्रम. फक्राबाद येथील अली शेख यांचे आकर्षक लाईट डेकोरेशन असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि २५ रोजी पहाटे ३ ते ६ या वेळेत लघुरुद्र अभिषेक आणि महाआरती संपन्न होणार आहे.तसेच घोडगावचा 'लाडका सागर' (घोडा), कुसडगाव येथील सोमनाथ गड वारकरी शिक्षण संस्थेचे भजन आणि काळोबाची काठी ही या सोहळ्याची प्रमुख आकर्षणे असतील.

या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहण्याचे आवाहन पै दादासाहेब सरनोबत. माजी सरपंच बापूसाहेब कार्ले व समस्त ग्रामस्थ कुसडगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीला ८.५० कोटींचा ढोबळ नफा

**अहिल्यानगर,** अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय आर्थिक कामगिरी नोंदवत ८ कोटी ५० लाख रुपयांचा ढोबळ नफा मिळविला आहे. आवश्यक तरतुदी म्हणून ४ कोटी ४० लाख रुपये वजा केल्यानंतर संस्थेला ४ कोटी १० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती चेअरमन संजय कडूस यांनी दिली. या नफ्यातून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केली आहे. मार्च २०२६ अखेर संस्थेची सभासद संख्या २७२६ इतकी असून वसूल भागभांडवल २७.१७ कोटी रुपये आहे. तसेच फंड्स २०.७२ कोटी, ठेवी १९४.८० कोटी आणि सभासदांना कर्ज वाटप १७९.४८ कोटी रुपये इतके आहे. सभासद कल्याण योजनांतर्गत विवाह भेट योजनेद्वारे ५८ सभासदांच्या पाल्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये देण्यात आले असून यासाठी २.९० लाखांचा निधी वितरित करण्यात आला. तसेच कुटुंब आधार विमा योजनेतून दोन मयत सभासदांच्या वारसांना ३० लाख रुपये, तर अपघात विमा अंतर्गत २० लाख रुपयांची मदत देण्यात आली. सभासदांसाठी २० लाखांपर्यंत कर्ज मर्यादा असून ठेवींवर ८ ते ९ टक्के आणि कर्जावर ९ टक्के व्याजदर ठेवण्यात आला आहे. खर्चात काटकसर करत संस्थेने आर्थिक स्थैर्य राखले असल्याचे कडूस यांनी नमूद केले.

### पुणतांबा मार्गे रस्ता चौपदरीकरणाची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :**कोपरगाव-पुणतांबा-श्रीरामपूर या राज्य मार्ग क्रमांक ३६ वर वाढत्या वाहतुकीमुळे रस्ता चौपदरीकरणाची तातडीची गरज असल्याचे प्रतिपादन मनसे शेतकरी सेनेचे तालुका अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केले आहे. या मार्गावर सध्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, दुहेरी रस्ता अरुंद पडत आहे. अनेक ठिकाणी अतिक्रमण झाल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या मध्यभागापासून दोन्ही बाजूंना १५ मीटर हद्द असल्याचे फलक लावले आहेत. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी रस्त्याची रुंदी केवळ १२ ते १५ फूट इतकीच दिसून येते, ही चिंताजनक बाब असल्याचे वहाडणे यांनी नमूद केले. हा मार्ग कोपरगाव व अहिल्यानगरकडे जाण्यासाठी सर्वात जवळचा व महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे वाढत्या वाहतुकीचा विचार करून रस्त्याचे तातडीने चौपदरीकरण करणे आवश्यक आहे. प्रशासनाने अतिक्रमण हटवून रस्त्याची रुंदी वाढवावी आणि नागरिकांना सुरक्षित व सुरळीत वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



# आमदार दातेंच्या नेतृत्वाखाली पारनेर राष्ट्रवादी कॉँग्रेसची आढावा बैठक संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** शुक्रवार दि. २४ एप्रिल २०२६ पारनेर शहरातील जिल्हा बँकेच्या सभागृहात पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक संपन्न झाली. आगामी राजकीय व संघटनात्मक वाटचालीस दिशा देणारी ही बैठक ठरली असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली. या बैठकीस जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, ज्येष्ठ नेते प्रभाकर




शेठ कवाद, मतदारसंघ अध्यक्ष विजुभाऊ औटी, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा कार्याध्यक्ष सुधामती कवाद, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, जिल्हा उपाध्यक्ष सोनाबाई चौधरी, युवा तालुकाध्यक्ष भास्कर उचाळे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, डी. आर. शेंडगे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर, उपाध्यक्ष रेश्मा गलांडे, आर. एस. कापसे, डॉ. प्रदीप दाते, मंगेश शेठ दाते, हरिष काका दावभट, राजेंद्र औटी, अनिल देठे, गोकुळ मामा काकडे, साहेबराव वाफारे, प्रदीप वाळुंज, देवराम मगर, अंजुम पठाण, सोनाली कुलथे, निलम गोसावी, अनिल मदगे, रामदास ढोले, संतोष सालके, पिनु रोहोकले, सुभाष सासवडे, संतोष मोरे, बाळासाहेब सोबले, बाबासाहेब दाते, बाळासाहेब रोकडे, सुभाष ठाणगे, राहुल तामखडे, जयसिंग कर्डिले, गणेश शिंदे, अक्षय गोरडे, सुनील रोकडे, अंकुश काशिद यांच्यासह राष्ट्रवादी कॉँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीदरम्यान पक्ष संघटन अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात आला. नव्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदाऱ्या निश्चित करत त्यांना सक्रिय व जबाबदारीने काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

## लहान मुलांच्या भांडणातून पती-पत्नीकडून महिलेला काठीने मारहाण, गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तुमच्या मुलीने आमच्या मुलाचा बॉल चोरला या कारणावरुन पती-पत्नीने मुलीच्या आईस लाथाबुक्क्यांनी व काठीने जबर मारहाण करून जखमी केले आहे. यावेळी झालेल्या झटापटीत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र गहाळ झाले आहे अशी तक्रार महिलेने पती-पत्नी विरोधात जामखेड पोलीस स्टेशन ला दाखल केल्याने पोलिसांनी भारतीय न्यासहाता २०२३ च कलम ११८(१), ३२४(४), ११५(२), ३५२.३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, संध्या दिपक निमोणकर (वय-३० वर्ष, रा. बेल्हेकरगल्ली जामखेड) यांनी फिर्याद दिली बुधवार दि. २२ रोजी सायंकाळी साडेआठ वाजता माझी मुलगी रिध्दी बेलेकर गल्लीतील राहत्या घरासमोर खेळत असताना आरोपी विनोद विटकर व त्याची पत्नी नाव माहीती नाही (दोघे बेल्हेकर गल्ली, जामखेड) दोघे आले व तुमची मुलगी रिध्दी हीने आमचे मुलाचा बॉल चोरला आहे तो आम्हाला दया असे म्हणुन त्यांनी फिर्यादी व त्यांची आई यांना शिवीगाळ, दमदाटी करुन लाथाबुक्याने व लाकडी काठीने मारहान करुन जखमी केले व तुम्हाला जिवंत सोडणार नाहीत अशी धमकी दिली आहे. सदरचे झटापटीत माझे गळयातील मंगळसूत्र पडुन गहाळ झाले आहे. अशी फिर्याद दिली. यावरून पोलिसांनी आरोपी पती-पत्नी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार शिवाजी कदम करत आहेत.

# श्रीराम विद्यालयात उन्हाळी संस्कार क्रीडा शिबिर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :-** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगाव येथील श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालयाथ उन्हाळी संस्कार क्रीडा शिबिराचे उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. पहाटेपासून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत शिबिराला उत्साहपूर्ण सुरुवात केली. शिबिरामध्ये सकाळची प्रार्थना, समूहगीत, ध्यान (मेडिटेशन), विविध मैदानी खेळ तसेच मनोरंजनात्मक उपक्रमांचा समावेश असून विद्यार्थ्यांनी याचा मनमुराद आनंद घेतला. या शिबिराचे उद्घाटन हभप आदिनाथ महाराज निकम हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना आदिनाथ महाराज यांनी मी या विद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे, असे सांगत शाळेचा गौरव केला. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना साने गुरुजींच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगून संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.

प्राचार्य संजय चेमटे बोलताना म्हणाले की आजच्या युगात अशा संस्कार शिबिरांची गरज अधिक असल्याचे स्पष्ट केले. या शिबिराचे आयोजन सलग तिसऱ्या वर्षी डॉ. ॲड. विद्याधर काकडे व हर्षदाताई काकडे यांच्या संकल्पनेतून यशस्वीरित्या होत असल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

शिक्षक मनोगतात पांडुरंग व्यवहारे यांनी संस्कार शिबिर आजच्या जीवनात किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. या शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे परिसरातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आहे.

शिबिर यशस्वी करण्यासाठी राम काटे, कल्याण राऊत, पांडुरंग व्यवहारे, स्वाती गरड, स्वाती भालसिंग, शंकर खोले, वैशाली धोंडे, सुधाकर आल्हाट, अमोल भालसिंग आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल भालसिंग यांनी केले व कार्यक्रमाचे आभार कल्याण राऊत यांनी मानले.सूत्रसंचालन वैशाली धोंडे यांनी केले.



## कामाचे पैसे मागितल्याचा राग
### मजुरावर दांडक्याने हल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** कामाचे पैसे मागितल्याच्या वादातून एका मजुरावर दांडक्याने हल्ला करून मारहाण करण्यात आल्याची घटना तिसगाव येथे घडली असून याप्रकरणी तिघांविरोधात पाथर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. राधाकिसन बबन रासकर (वय ३६, रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दि. २२ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता त्यांनी सादिक रशिद शेख याच्याकडे कामाचे पैसे मागितले असता त्याने पैसे देण्यास नकार दिला. यानंतर दोघांमध्ये किरकोळ वाद झाला.दरम्यान, दि. २३ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजता सादिक शेख हा रासकर यांच्या घरी जाऊन कोणतेही कारण नसताना त्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेला. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता वृद्धेश्वर हायस्कूल परिसरात मतदान करून बाहेर आलेल्या रासकर यांना तिसगाव वेशीसमोर पुन्हा गाठण्यात आले.

यावेळी सादिक शेख याने हातातील लाकडी दांडक्याने रासकर यांच्या डाव्या हाताच्या मनगटावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच अन्य दोघांनी लाथाबुक्यांनी मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत नमूद आहे. जखमी अवस्थेत रासकर यांनी पाथर्डी पोलीस ठाणे गाठले. व उपचार घेतल्यानंतर त्यांनी पुन्हा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे तिसगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपास पाथर्डी पोलीस करत आहेत.मारहाण करणाऱ्या आरोपींमध्ये दोन अल्पवयीन तरुणांचा समावेश आहे.

## एमआयडीसी प्रशासनाकडून अखेर चौकशीचे आश्वासन, गुन्हे दखल होणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील एमआयडीसीच्या ताब्यात असलेल्या जमिनीतून गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर मातीचा उपसा सुरू होता. विशेष म्हणजे, इतक्या मोठ्या प्रमाणावर माती चोरी होऊनही एमआयडीसी प्रशासन यापासून अनभिज्ञ असल्याचे दिसून आले. श्रीगोंदा एमआयडीसीसाठी संपादित केलेल्या, परंतु अद्याप विकसित न झालेल्या जमिनीवर माती चोरांनी डल्ला मारला आहे. गेल्या काही दिवसांत ३ ते ४ ठिकाणांहून छुप्या पद्धतीने मातीचा उपसा करण्यात आला. एक मातीचा हायवा ७ ते ९ हजार रुपयांना विक्री होत असल्याची माहिती काही शेतकऱ्यांनी दिली आहे., जवळपास अंदाजे ४००-५०० हायवा माती लंपास करण्यात आली आहे. या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. या संदर्भात एमआयडीसी प्रशासन अधिकारी गणेश राठोड यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली आहे. राठोड यांनी सांगितले की, ''सदर जागा अद्याप विकसित झालेली नसल्याने तिथे कर्मचारी किंवा सुरक्षा रक्षकांचा बंदोबस्त नाही . मात्र, माती चोरीचा प्रकार निदर्शनास आल्यानंतर आता आम्ही महसूल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि पोलीस प्रशासनाला पत्र देऊन कळवणार आहोत.''या प्रकरणाने एमआयडीसीच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, स्थानिक महसूल विभाग यावर काय कारवाई करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### दोषींवर गुन्हे दाखल होणार?


**एमआयडीसीच्या सिव्हिल विभागामार्फत या जागेची प्रत्यक्ष पाहणी (सर्वे) केली जाणार आहे. या पाहणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आणि चोरीची खातरजमा झाल्यानंतर अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया राबवली जाईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

====================

**''एमआयडीसीमध्ये पाणीपुरवठा, सिव्हिल आणि प्रशासन असे तीन विभाग असतात. आम्ही तातडीने सिव्हिल विभागाला या ठिकाणची पाहणी करण्यास सांगतली आहे . महसूल आणि पोलीस विभागाच्या मदतीने या चोरीला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली जातील.''**

**` गणेश राठोड,**
**एमआयडीसी प्रशासन अधिकारी**

## नागापूरच्या सरपंचपदी गणेश मस्के सदस्यपदी अक्षय रिठे बिनविरोध

**नागापूर (ता. आंबेगाव) :** ग्रामपंचायत निवडणुकीत गणेश मस्के यांची सरपंचपदी तर अक्षय रिठे यांची सदस्यपदी बिनविरोध/बहुमताने निवड झाली आहे. या विजयानंतर संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून समर्थकांनी फटाके फोडत व गुलाल उधळत जल्लोष साजरा केला. गणेश मस्के हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व विकासात्मक कार्यात सक्रिय असून गावातील विविध प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत ग्रामस्थांनी त्यांच्यावर सरपंचपदाची जबाबदारी सोपवली आहे. त्यांच्या निवडीमुळे गावाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीनंतर बोलताना गणेश मस्के म्हणाले, गावातील सर्व घटकांना सोबत घेऊन पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन देण्यावर माझा भर राहील. पाणीपुरवठा योजना सक्षम करणे, अंतर्गत रस्त्यांची कामे, स्वच्छता अभियान राबवणे, तसेच शिक्षण व आरोग्य सुविधा सुधारणे यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे हेही आमचे ध्येय असेल.तसेच युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, महिलांच्या बचत गटांना बळकटी देणे आणि गावातील मूलभूत सुविधा वाढवणे हेही त्यांच्या कार्यसूचीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, माजी सरपंच गणेश यादव,उप सरपंच सुनिल शिदे,ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक मान्यवर तसेच ग्रामस्थांनी गणेश मस्के व अक्षय रिठे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सर्वांना सोबत घेऊन विकासाची गती वाढवू, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी ग्रामस्थांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# आत्मा मालिकमध्ये कुस्ती क्षेत्रात करिअर घडवण्याची संधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव -** भारतीय खेल प्राधिकरणाच्या वतीने कोकमठाण येथील आत्मा मालिक कुस्ती केंद्रात येत्या २५ व २६ एप्रिल रोजी केंद्र सरकारच्या दत्तक आखाडा योजने अंतर्गत मुलांची कुस्ती निवड चाचणी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. पंधरा वर्षाखालील मल्लांसाठी हि स्पर्धा आहे. त्यातून तिस मल्लांची निवड केली जाईल. त्यांना केंद्र सरकारकडून दरमहा एक हजार रूपये शिष्यवृती, स्पोर्ट्स किट व आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मिळेल.



कुस्तीला प्रोत्साहन मिळावे यासाठी केंद्र सरकारने उपलब्ध करून दिलेल्या या संधीचा लाभ घेण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त कुस्तीगीरांनी या निवड चाचणी साठी उपस्थित राहावे. असे आवाहन विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

> आत्मा मालिक कुस्ती केंद्रात सध्या ८५ मल्ल प्रशिक्षण आणि सराव करीत आहेत. भारतीय खेल प्राधिकरणाच्या निवड चाचणीत जे तिस मल्ल निवडले जातील त्यांना या केंद्रात राहून प्रशिक्षण घेतात. त्यांची वर्षभरातील विविध कुस्ती स्पर्धातील कामगिरी लक्षात घेऊन चार वर्षे प्रशिक्षण दिले जाते.
>
> **नंदकुमार सुर्यवंशी**
> **अध्यक्ष,**
> **विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्ट,**
> **कोकमठाण**

इच्छुक खेळाडूंनी येत्या २५ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता आत्मा मालिक कुस्ती केंद्रात हजर रहावे. जन्मदाखला, आधारकार्ड, शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र, खेळाचे प्रमाणपत्र व दोन पासपोर्ट साईझ फोटो हे कागदपत्र सोबत आणावेत. ही निवड चाचणी प्रक्रिया भारतीय खेल प्राधिकरणाचे प्रशिक्षक रुपेरंदर पुनिया आणि आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक भरत नायकल यांच्या समितीच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

# योग्यवेळी निदान व उपचाराने मूत्रविकाराच्या सर्व समस्या बरे होतात -डॉ. अजित दरंदले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** मूत्रविकाराच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास पुढे जावून ते गंभीर आजाराचे रुप धारण करतात. योग्यवेळी निदान व उपचार केल्यास मूत्रविकाराच्या सर्व समस्या बरे होतात. तसेच आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत तंत्रज्ञान आणि तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली यावरील शस्त्रक्रिया अद्यावत मशिनरी, दुर्बीणद्वारे होत आहे. गंभीर आजारांना तोफ्लड देण्यापेक्षा योग्यवेळी तपासणी व औषधोपचार हेच निरोगी जीवनाचे मुलमंत्र ठरत असल्याचे प्रतिपादन मूत्रविकार तज्ञ डॉ. अजित दरंदले यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित मूत्रविकार तपासणी आणि उपचार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. दरंदले बोलत होते. यावेळी मूत्रविकार तज्ञ डॉ. अमेय सांगळे, डॉ. वसंत कटारिया, डॉ. आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा आदी उपस्थित होते.



प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटलची स्थापना करतानाच सेवाभाव हा उद्देश समोर ठेऊन आजपर्यंत रुग्णसेवेचा वसा जोपासला जात आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मोफत शिबिर सर्वसामान्य घटकांना आधार देत आहे. एका छताखाली सर्व आरोग्य सेवा मिळत असल्याने सर्वसामान्यांना याचा लाभ घेणे शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अमेय सांगळे म्हणाले की, वाढत्या उन्हाळ्यामुळे उष्माघातचे प्रमाण वाढत आहे. किडनी स्टोनचे प्रमाण उद्भवत असून, यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. काही त्रास झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन योग्य तपासणी करणे गरजेचे आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मूत्रविकाराच्या सर्व समस्यांवर उपचार उपलब्ध असून,महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रिया होत असल्याची त्यांनी माहिती दिली. तर मूत्रविकार, पोटात दुखणे, लघवीचे त्रास अंगावर न काढता तातडीने प्राथमिक तपासणी करण्याचे आवाहन केले.

या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी प्रोस्टेट रोग उपचार, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरुष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन आणि व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मुत्राशय, प्रोस्टेट, पुरुषांचे जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन आदी संदर्भात ६६ रुग्णांच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार माणकचंद कटारिया यांनी मानले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री











# प्रसन्नतेचा पारिजात-गुरुमाता गं.भा. श्रीमती सरुबाई पेसोडे पाटील



जन्म असा जावा, देह चेदनाचा व्हावा, मृत्यु असा यावा सारा आसमंत चिंब व्हावा या उक्तीची प्रचीती रविवारी १२ एप्रिलला आली. शांतीब्रम्ह महंत श्री भास्करगिरीजी महाराजांच्या परमपुज्य मातोश्री व सर्वांच्या गुरूमाता श्रीमती सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील यांचे वयाच्या ९९ व्या वर्षी सकाळी सुर्योदयाचे वेळी ६ .१५ वाजता दुःखद निधन झाले आणि ही बातमी समजताच सारे भक्तगण श्री क्षेत्र देवगडच्या दिशेने मार्गक्रमण करु लागले. दिवसभरात लाखोंच्या संख्येने जनसागर देवगड क्षेत्री गोळा झाला, प्रत्येकाची आई गेल्याची भावना प्रत्येकाच्या मुख कमलावर होती. लक्ष्मी आणि सरस्वती हातात हात घालुन जशा नांदतात अशा प्रवरा नदीच्या काठी अन्नपूर्णा च्या प्रांगणात आई साहेबांच्या कलेवरावर ब्रम्हवृंदाच्या मंत्रघोषातअंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी खरोखर सारा आसमंत चिंब झाला होता

ज्या मायमाऊलीने ज्ञानसूर्यासमान असलेल्या शांती ब्रम्ह गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांना जन्म दिला ती माऊली किती भाग्यवान असली पाहीजे, त्यांना सारे भक्तगण आईसाहेबच म्हणायचे.बुलढाणा जिल्हयातील नांदुरा तालुक्यातील बेलाड हे आईचे माहेर,शेतकरी कुटुंबातील मातापित्यांनाही अध्यात्माचा वारसा लाभला होता. आळंदी व पंढरीची पायी वारी हा या कुटुंबाचा नित्यनेम होता.सरुबाईवर मातापित्यांनी सुसंस्काराचे बीजारोपण केले होते

अल्पशिक्षीत सरूबाईची खामगाव तालुक्यातील पिंपराळा येथील शेतकरी कुटुबातील ज्ञानदेव जगदेव पेसोडे पाटील यांच्याशी यथावकाश विवाह झाला सरूबाईच्या पाऊलांनी पेसोडे-पाटील परीवारात गृहलक्ष्मी व ज्ञान शारदेचा प्रवेश झाला. सरूबाईच्या आगमनाने या परीवाराचे भाग्य शतगुणीत झाले.

ज्ञानदेव पेसोडे पाटील यांचे कुटुंब मोठे होते,आल्या गेल्याची सतत वर्दळ असायची. सरूबाई मात्र सर्वांचाच आदर करायच्या,चहापाणी जेवणाखाण याकडे लक्ष द्यायच्या, आईवडीलांप्रमाणे सासू सासऱ्यांची सेवा करायच्या

पेसोडे पाटील परीवाराचे धाब्याचे घर होते, ज्ञानदेव पेसोडे पाटील यांना गुरुवर्य श्री भास्करगिरीबाबांसह कमलताई व मधुकर अशी तीन अपत्ये होती.ऑक्टोबर १९५२ मध्ये गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांचा जन्म झाला. कमलताईचा विवाह नांदुरा येथील पांडुरंग रायपुरे यांच्याशी झाला. सरुबाईंचा दुसरा मुलगा मधुकरराव हे शेती करतात त्यांना ही तीन मुली,दोन मुले आहेत कमलबाईंना तीन मुले व दोन मुली आहेत.

गुरुवर्य श्री भास्करगिरीबाबांचे बालपणीचे मित्र जागृती आश्रमाचे शंकरजी महाराज हे दोघेही देवदेवांचे खेळ खेळायचे,दगडाचे टाळ करून काकडा,हरीपाठ म्हणायचे, बाळुची शिवपिंड करून तिला पाणी घालायचे सखारामपुर संस्थानचे महंत श्रीराम महाराज हे श्री भास्करगिरींची ज्ञानोपासना करुन घ्यायचे, मुक्ताईनगर, पंढरपूरला दिंडया न्यायचे.परमपूज्यनिय श्री भास्करगिरीजी बाबांनी आजन्म ब्रम्हचर्याचा संकल्प करून अध्यात्मात लक्ष घातले,अभ्यास केला,श्रीराम महाराजांचे ते आवडते शिष्य बनले

श्री क्षेत्र देवगडच्या किसनगिरी महाराजांच्या आग्रहामुळे वयाच्या चौदाव्या वर्षी भास्करगिरीबाबांना श्री क्षेत्र देवगडला यावे लागले. गुरू पुज्यनिय श्री समर्थ सदगुरू किसनगिरीबाबांची त्यांनी अखेरपर्यंत मनोभावे सेवा केली.जीव ओतून देवगडला पृथ्वीतलावरचा स्वर्ग बनवला.श्री क्षेत्र देवगड हे राज्यातील पवित्र,मंगलमय, सुंदर निसर्गरम्य तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रातील लाखो भाविक भक्तगण देवगडवर प्रेम करतात.

गुरुमाता आईसाहेब सरुबाई हया मृत्युपुर्वी शेवटची दोन वर्षे श्री क्षेत्र देवगडलाच गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांच्या निगराणीत होत्या.त्यांची कन्या कमलताई त्यांची सेवा शुश्रूषा येथे करायच्या,दर्शनाला येणाऱ्या भाविकांशी संवाद साधून आई साहेब स्मितहास्य करून स्वागत करायच्या,त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील रेश न रेघ ही

त्यांनी आयुष्यभर घेतलेल्या कष्टाचे प्रतीक होते.पती निधनापासून त्या अस्वस्थ होत्या. त्या नेहमी म्हणायच्या माणसाच्या शरीरात हदयापेक्षाही मौल्यवान असते मन,एकमेकांची मने जपली ती सांभाळली तर संसार सुखाचा होतो.

आईसाहेबांच्या अशा मार्गदर्शनामुळे ग्रामीण भागातील महीला पुरुषांना दिलासा मिळायचा. गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज हे आईचे दर्शन घेऊनच दिवसाचा कार्यारंभ करायचे,अलीकडच्या काही दिवसात आई साहेबांची प्रकृती बरी नव्हती,सर्वजण सर्वप्रकारे आई साहेबांची काळजी घ्यायचे. डॉक्टरांकडूनही नियमीत तपासणी व्हायची त्यामध्ये हदयरोग तज्ञ नेवासाफाटा येथील डॉ.अविनाश काळे व त्यांच्या धर्म पत्नी अँड.सौ. प्रियंकाताई काळे यांच्यासह इतरांनी ही देवगड येथे थांबून दिवसरात्र सरुबाईंची सेवा केली

मात्र त्यांच्या या सर्व प्रयत्नांना यश आले नाही. रविवारी सुर्योदयाचे वेळी आईसाहेब आम्हा सर्वांना सोडुन गेल्या.सर्वांच्या हदयात सूर्यास्त झाला. आईसाहेबांच्या अंत्ययात्रेला राज्यातील मान्यवर मंडळी,संत मंडळी, वारकरी संप्रदायातील भक्त मंडळी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थीत होते.उपस्थित लाखोंचा जनसागर डोळ्यात प्राण आणून आईसाहेबांचे अखेरचे दर्शन घेत होता. प्रसन्नतेच्या या पारिजातकाला अखेरची

## भावपूर्ण आदरांजली...

शब्दांकन : अँड.बाळासाहेब तनपुरे पाटील
संकलन : सुधीर चव्हाण
दैनिक राष्ट्र सहयाद्री
नेवासा तालुका प्रतिनिधी



मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा.सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील
चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली....

श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, श्री क्षेत्र नेवासा
मार्गदर्शक - वेदांताचार्य ह.भ.प.देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री
अध्यक्ष, सर्व विश्वस्त व भक्त परिवार


मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा.सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील


चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली....
* महंत श्री श्री १००८ गुरुवर्य दिगंबर बाबाजी आराध्य
* उत्तराधिकारी महंत श्री आवेराजजी महाराज
तिर्थक्षेत्र शिनाई जागृत देवस्थान भानसहिवरे
सर्व ग्रामस्थ भक्त परिवार

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा.सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील
चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली....

अजय दामोदर साबळे पाटील
मार्गदर्शक मुरुमे ग्रामपंचायत ता.नेवासा,
सरपंच सौ.कविता अजय साबळे पाटील
बेलपिंपळगाव जि. प. गट सर्व भक्त परिवार

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील

चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली
श्री कालभैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र बहिरवाडी ता.नेवासा,
अध्यक्ष, सर्व विश्वस्त व बहिरवाडी ग्रामस्थ
देवगड भक्त परिवार

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील

चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली
श्री कल्याणराव उभेदळ पाटील
मार्गदर्शक आदर्शगाव सुरेशनगर
सरपंच : सौ.शैलाताई कल्याणराव उभेदळ
सर्व ग्रामस्थ सुरेशनगर

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील

चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली
हॉटेल मातोश्री - उगले बंधू मिठाईवाले
टोका प्रवरासंगम
प्रो.प्रा.युवासेना नेते शुभम उगले पाटील

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील

चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली
अँड.रविंद्र प्रभाकरराव सारंगधर
संस्थापक अध्यक्ष, कविजंग कलाक्रीडा सांस्कृतीक मंडळ, भानसहिवरे
अध्यक्ष - अ.भा.जैन संघटना नेवासा तालुका

मायेचा आधारवड
वैकुंठवासी गं.भा. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील

चौदावा विधी निमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली
श्री.बन्सीभाऊ आगळे पाटील
अध्यक्ष - जि.प.से.नि.नेवासा
चेअरमन साईतेज गृहनिर्माण संस्था

वैकुंठवासी गं.भा.सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील
चौदावा विधी निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

संत सेवक
बदाम महाराज पठाडे
गोधेगावकर, सर्व भक्त मंडळ

वैकुंठवासी गं.भा.सरूबाई ज्ञानदेव पेसोडे पाटील
चौदावा विधी निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली

श्रीधर महाराज अनुभुले
गोधेगाव, ता.नेवासा

जाहिरात सौजन्य - लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, लक्ष्मण महाराज नांगरे, अजय साबळे, संदिप साबळे, संतोष रायपूरे, रामेश्वर तनपूरे, मनोज पवार, महेंद्र पलटने, बंटीभाऊ पठाडे